# जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव

**सभा क्र. ४७ // ऑनलाईन स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त // दिनांक : ३०/०६/२०२१**

जळगांव शहर महानगरपालिकेत दि.३०/०६/२०२१ बुधवार रोजी सकाळी ११.०० वाजता जळगांव शहर महानगरपालिकेच्या सरदार वल्लभभाई पटेल टॉवर प्रशासकीय इमारतीमधील २ ऱ्या मजल्यावरील सभागृहात स्थायी समिती सभापती पाटील राजेंद्र झिपरू यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या ऑनलाईन स्थायी समिती सभेचे कार्यवृत्त. खालील मा.सदस्य सभेस उपस्थित होते.

**मा. पाटील राजेंद्र झिपरू सभापती तथा पिठासीन अधिकारी**

| | |
|---|---|
| दारकुंडे नवनाथ विश्वनाथ | बाविस्कर किशोर रमेश |
| सोनवणे मुकुंदा भागवत | काळे अमित पांडुरंग |
| देशमुख प्रतिभा गजानन | पाटील कुलभुषण विरभान |
| काळे रेश्मा कुंदन | लढढा नितीन बालमुकुंद |
| चव्हाण ज्योती बाळासाहेब | बरडे नितीन मनोहर |
| बेंडाळे उज्वला मोहन | नाईक प्रशांत सुरेश |
| नेरकर सरिता अनंत | शेख सैईदा युसुफ |
| कोल्हे ललित विजय | |

सदर सभेस मा.आयुक्त, श्री.सतिश कुलकर्णी, मुख्यलेखा परिक्षक, श्री.संतोष वाहुळे,नगरसचिव ,श्री.सुनिल गोराणे, उपायुक्त, शाम गोसावी, उपायुक्त,प्रशांत पाटील, मुख्यलेखाधिकारी, श्री.कपिल पवार, सहा.आयुक्त, श्री.आकाश डोईफोडे व सहा.आयुक्त. श्री.पवन पाटील उपस्थित होते.

**वंदे मातरमने सभेला सुरुवात करण्यात आली.**

**नगरसचिव :-** आजच्या सभेमध्ये सर्वांचे स्वागत आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय मला काही विचारायचे आहे सभा सुरु होण्याच्या पहिले. अध्यक्ष महोदय, सभा सुरु होण्यापुर्वी मला अध्यक्ष महोदयांना विचारायचे आहे काही.

**मा.सभापती :-** नवनाथ भाऊ आपल्याला संपुर्ण वेळ मिळणार आहे बोलण्यासाठी, सभा सुरु होऊ द्या, सभा सुरु झाल्यानंतर तुमचाच विषय घेऊ आधी.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** नाही नाही, बरोबर आहे सभा सुरु होण्याच्या पहिले मला एक सांगा तुम्ही दिड महिन्यानंतर तुम्ही सभा घेत आहे. लोकांचे हिताचे प्रश्न अडकलेले आहे तुमच्या स्थायीच्या मंजुरीसाठी हे कुठ पर्यंत चालणार आहे. जोपर्यंत आम्ही पत्र देतो तोपर्यंत तुम्ही सभा घेता. कोणाच्या वर्कऑर्डरी बाकी आहे. पाऊसाळयाच्या पहिले ते डांबरीकरणचे विषय बाकी आहे. आतापर्यंत १ महिन्यामध्ये तुम्ही मिटींग काढली असती तर त्याच्या पहिले डांबरीकरण होऊन गेले असते. काही विषय अडकलेले आहे. मंजुरीसाठी विषय अडकलेले आहे. म्हणजे तुम्ही दिड दिड महिन्यानंतर मिटींग काढतात. म्हणजे तुमच्यापहिले जे सभापती होते. ते आठ दिवसांनी मिटींग काढायचे, ते व्यवस्थीत होते. असा आमचा तुमच्यावर आरोप आहे.

**मा.सभापती :-** शासनाचे स्पष्ट निर्देश आहे. कोविडच्या व्यतिरिक्त कुठल्याही विषयासाठी सभा बोलविण्यात येऊ नये. असे शासनाचे पत्र आलेले आहे आपल्या महापालिकेला,

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** शासनाचे पत्र आलेले आहे, शासनाचे फक्त जमावबंदीसाठी पत्र आहे साहेब. असे आपण ऑनलाईनवर घेऊ शकतो. असे कोणी सांगितले तुम्हाला की, कोणते विषय घ्यायचे नाही. स्थायीचा विषय असा आहे दर आठ दिवसाने मिटींग घेतली पाहिजे. विषय असो किंवा नसो जळगांव शहराचे हिताचे प्रश्न चालत राहता.

**मा.सभापती :-** कोविडच्या निर्बंधामुळे आपण फक्त कोविडचे विषय असतील तरच मिटींग बोलविण्यात यावी असे शासनाचे पत्र आहे. पण तुमची ईच्छा असेल तर आपण प्रत्येक आठवडयाला मिटींग घेऊ.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आहो राजु भाऊ, दोन टाईम तसेच झाले, आता दिड दिड महिन्याने मिटींगा काढतात कस होईल.

**नगरसचिव :-** विषयपत्रिकेवरील विषयांना सुरुवात करण्यात येत आहे.

**नगरसचिव :- विषय क्र. १:-** दि.०८/०३/२०२१ व दि.१०/०५/२०२१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**श्री.नितीन लढढा :-** इतिवृत्त कायम करण्यात यावे. विषय मान्य आहे.

**श्री.मुकुंदा सोनवणे :-** माझे अनुमोदन आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.३३५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, दि.०८/०३/२०२१ व दि.१०/०५/२०२१ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- लढ्ढा नितीन बालमुकूंद**

**अनुमोदक :- सोनवणे मुकुंदा भागवत**

**नगरसचिव :- विषय क्र. २:-** नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मंजुर निधीच्या विनियोगाबाबत महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.संर्कीण-११९८/प्र.क्र.३०/नवि-०४ दि.२१ मे, २०२१ ची माहिती घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** याच्या संदर्भात माहिती घेतली सभापती महोदय परंतु सन २०१५-१६ चा जो निधी हा अखर्चीत असल्याकारणाने परत गेला असेल त्याची अमाऊंट किती होती.सन २०१५-१६ च्या अखर्चीत निधीची नेमकी परिस्थिती काय होती.

**श्री.मुकुंदा सोनवणे :-** माझे अनुमोदन आहे.

**मा.सभापती :-** पवार साहेब माहिती द्या.

**श्री.कपील पवार :-** अजुन पर्यंत सन २०१५-१६ चा अखर्चीत निधी परत गेलेला नाही. ती फाईल प्रोसेस मध्ये आहे. आणि तो निधी लवकरच आठ दिवसात आम्ही मार्गी लावणार आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** परंतु ती अमाऊंट किती आहे.

**श्री.कपील पवार, मु.ले.अ. :-** सर डिपार्टमेंटकडे फाईल असल्यामुळे आता अमाऊंट काही सांगता येणार नाही. काही कामे जे प्रोसेस मध्ये असतील त्याची आपल्याला परवानगी घ्यायची आहे. जे पुर्णपणे फ्री आहे तेच पैसे आपल्याला परत करायचे आहे. त्यामुळे संपुर्ण अमाऊंट क्यालक्युलेट करुन सांगतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** परंतु बघा जेव्हा शासन निर्णय आला. त्याच्या संदर्भातली माहिती आपण सभागृहाला अवगत करत असतांना सन २०१५-१६ च्या अखर्चीत निधीची माहिती अद्यापपावेतो आपल्यासमोर नाही. नेमका तो निधी कुठल्या कारणाने युटीलाईझ झाला नाही आणि नाखर्ची झाला असेल तर त्याला नेमकं जबाबदार कोण ? या संदर्भातली तर माहिती अपडेट पाहिजे ना प्रशासनाकडे.

**श्री.कपील पवार, मु.ले.अ. :-** सर त्या फाईली प्रोसेस मध्ये असल्यामुळे ते अपडेट नाही. मी पुढच्या सभेला सविस्तर माहिती देतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अहो सर, २०१५-१६ चा निधी आहे. तो काही सन २०२०-२१ चा किंवा सन २०२१-२२ चा निधी नाही की, त्याच्या संदर्भातली परिस्थिती जी आहे ती अद्यापपावेतो आपल्याकडे अपडेट होऊन आलेली नाही. सन २०१५-१६ म्हणजे आज जवळपास तब्बल ५ वर्षाचा कालावधी झालेला आहे. आणि ५ वर्षाच्या कालावधीत सुध्दा प्रशासनाकडे जर आजच्या स्थितीत माहिती अपडेट नसेल तर मला वाटते की, ही गंभिर बाब आहे.

**श्री.कपील पवार, मु.ले.अ. :-** सर याच्या बाबतीत सर्वात महत्वाची बाब की, याच्या अगोदरचा जो जी.आर.आहे. दि.११ जुन २०२० चा त्या जी.आर.मध्ये सन २०१५-१६ चा निधी खर्च करायला परवानगी होती. त्यामुळे त्या फाईली प्रोसेस मध्ये सुरु होत्या. आता हा जी.आर.आला दि.२१ मे २०२१ ला. त्यानंतर डिपार्टमेंटवाईज या वेगवेगळया स्किम आहे. त्यामुळे डिपार्टमेंट कढुन संकलीत करायचे काम सुरु आहे. आता माहिती देणे गरजेचे होते त्या बद्दल मी दिलगीरी व्यक्त करतो. पुढच्या सभेला मात्र मी निश्‍चित माहिती उपलब्ध करून देतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे माझा सांगण्याचा तात्पर्य इतकच आहे की, अश्या पध्दतीने मनपाकडे आलेला निधी हा विहित मर्यादेमध्ये खर्च होत नसेल आणि तो निधी व्यपगत होत असेल तर ही बाब शहराच्या आणि महानगरपालिकेच्या दृष्टीकोणातुन योग्य नाही. म्हणजे आपण शासन निर्णय येई पावेतो, जो पर्यंत अखर्चीत निधी शासन परत मागत नाही. तो पर्यंत आपण निधीचा विनियोग करु शकत नाही. ही सुध्दा प्रशासनाने खबरदारी घेण्याची बाब आहे. प्रशासनाने बॉडी समोर या गोष्टी निदर्शनास आणायला पाहिजे. सदरहु निधीची मुदत या या तारखेपर्यंत असल्या कारणाने हा निधी खर्च करणे योग्य आहे. त्या संदर्भात बॉडीलाही निर्णय घेणे संदर्भातल्या गोष्टी योग्य होता.

**श्री.कपील पवार, मु.ले.अ. :-** सर, या बाबतीत आम्ही मागे एक आमच्या स्तरावर बैठक घेतली होती आणि जो निधी खर्च करायला मुदत आहे. त्या बाबतीत प्रत्येकाला अवगत करुन दिले होते. आणि त्या आधारावर काम झालेले आहे असे मला वाटते.

**श्री.नितीन लढ्ढा :-** म्हणजे प्रशासनाने मला वाटते यापुढे ऐवढी खबरदारी घ्यायला पाहिजे की, कुठल्याही परिस्थिती मध्ये शासनाकडुन आलेला निधी हा व्यपगत होणार नाही.आणि तो विहित कालमर्यादेमध्ये तो खर्ची पडायला पाहिजे. म्हणजे एकीकडे निधी नाही म्हणुन विकास कामे खोळंबली जातात आणि दुसरीकडे निधी व्यपगत होऊन जातो. याबाबतीत ही एकदुसऱ्याशी सुसंगतपणा दिसुन येत नाही.

**मा.आयुक्त :-** मा.सभापती महोदय, आता जी काही आपण चर्चा करत आहोत. त्याअनुषंगाने शासनाचा जो निधी अनेक स्वराज्य संस्थांना मिळतो. तो ज्या वर्षामध्ये निधी मिळतो. ते वर्ष आणि त्यानंतर लगतचे दुसरं वर्ष असे दोन वर्षात तो निधी खर्च करणे आपल्यावर बंधनकारक आहे. उदहारणार्थ जर सन २०१९-२० मध्ये निधी मिळाला असेल तर तो सन २०२०-२१ च्या शेवटी म्हणजे सन २०२०-२१ मार्च पुर्वी खर्च केला पाहिजे.साधारणता एक ते दिड वर्षाचा कालावधी आपल्याला कुठल्याही कामासाठी मिळतो आणि जसे सन्मा.सदस्य म्हणत आहे तसे त्या कालावाधी मध्ये ही कामे पुर्ण करुन घेणे शक्य आहे. परंतु आता जर आपण बघितल २५ कोटीचा निधी असेल किंवा दोन वेळा आपल्याला मिळालेले ५-५ कोटी मुलभुत सोईसुविधा मधले किंवा नगरोत्थान मधील निधी असेल, आमदार निधी असेल, खासदार निधी असेल किंवा आता आपल्याला जिल्हा नियोजन समिती मधुन मिळणारा निधी असेल याच नियोजन आपण व्यवस्थीतपणे करत आहे आणि तो निधी वेळेमध्ये खर्च होत आहे. सन २०१५-१६ च्या बाबतीमध्ये आता जे कॅफोनी सांगितल त्या प्रमाणे, त्याच्यापैकी किती कामे हाती घेतलेली होती आपण आणि त्यापैकी खरोखर काही निधी परत जाणार आहे का ? या बद्दलचा अठावा घेण्याचे आता आमचे काम चालु आहे. निधी परत जाईल अशी परिस्थिती आहे किंवा नाही हे बघावे लागेल. कारण सन २०१५-१६ च्या कामाला जवळपास आता ५ वर्षे झालेली आहे. त्यामुळे त्या कामाचा नियोजन आणि अंमलबजावणी निश्चितपणे झोलेली असेल असे प्रथमदर्शनी वाटत आहे. तरी परंतु काही कामांचा निधी अखर्चीत राहिला असेल. तर त्याचा आपण आढावा घेतो आहे. आणि पुढच्या बैठकीमध्ये क्याफोंनी सांगितल्याप्रमाणे लेखाविभागामार्फत किती निधी शिल्लक आहे आणि या जी.आर.प्रमाणे आपल्याला खर्च करण्यासाठी बंधन असल्याने तो परत द्यावा लागेल. त्याचा आपण सविस्तर अहवाल ठेवु. मात्र या सर्व चर्चेच्या पाठीमागची मुळ भावना सन्मा.सदस्यांची आहे की, एका बाजुला आपल्याकडे निधी नाही आणि दुसऱ्या बाजुला आपल्याकडे निधी आला तर तो परत जाण्याची भिती राहते. अश्या परिस्थितीमध्ये प्राप्त निधीचा नियोजन आणि त्याची अंमलबजावणी वेळेत होईल या दृष्टीने प्रशासन निश्चित गंभिरतेने पुढच्या काळात हे करेल. आणि मला खात्री आहे की, मागच्या तिन चार वर्षामधील निधी आपण जर बघितलं तर कुठलाही निधी आपल्याला परत जाण्याची वेळ येत नाही. एकुण २५ कोटी मधला शिल्लक निधीमधुन आपण नविन कामे घेण्याचे सुध्दा प्रस्ताव आपण त्याच्यामध्ये करीत आहे. त्यामुळे निधी परत न जाता, तो महापालिकेच्याच सार्वजनिक कामांसाठी कसा उपयोग होईल. या दृष्टीने आवश्यक ती दक्षता आपण पुढच्या काळामध्ये घेऊ.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय, जसे आयुक्त साहेबांनी आता सांगितले की, आता पर्यंत आपला कुठलाही निधी हा परत गेलेला नाही या दृष्टीने आतापर्यंत आपण काम करत होतो किंवा याच्या पुढे भविष्य काळामध्ये कुठलाही निधी व्यपगत होणार नाही याच्या दृष्टीने काम करु. पण साहेब मी तुम्हाला नुकताच विषय सांगतो. मागच्या महासभेमध्ये आपण प्रशासनाकडुन एक ठराव पारीत केला होता. आणि तो आपण सर्वानुमते मंजुर पण केला होता.अग्निशमन संबंधातला तो विषय होता. आपल्याला ५० लक्ष रुपयांचा नगरविकास विभागाकडुन DPDC च्या माध्यमातुन आपल्या महानगरपालिकेला मिळाले होते. त्याच्यात आपल्या

महानगरपालिकेला पत्र होत. DPDC चे पत्र देखील होत की, आपल्याला ५० लाख रुपयांची अलॅटमेंट करण्यात येत आहे. आपण आपला प्रस्ताव इकडील कार्यालयात सादर करावा. त्याचा आपण ठराव केलेला आहे. पण तेथे वेळेत आपला प्रस्तावच पोहचला नाही. ते पैसे ३१ मार्चला लॅप्स झाले. मग साहेब अश्या पध्दतीने जर काम चालत असेल, तर आपले अधिकारी कर्मचारी वेळेत काम करत नसतील. आपल्याला शासनाचा निधी जो आपल्याला शासनाकडुन मिळत आहे. तो जर अश्या पध्दतीने लॅप्स होत असेल, तर साहेब या संबंधीतांवर कार्यवाही नाही झाली पाहिजे का ? पहिलेच आपली महानगरपालिकेची परिस्थिती आज रोजी अशी आहे की आपण आज रोजी स्वायीत्त नाही. आणि अश्या परिस्थितीमध्ये आपल्याला शासनाची मदत घ्यावी लागते.आपण शासनाकडे हात पसरवितो आहे. शासन आपल्याला निधी देतो आणि त्यावेळेस जर का कधी अश्या परिस्थितीमध्ये आपले अधिकारी कर्मचारी जर का त्याच्यात दुर्लक्ष करत असतील. निष्काळजीपणाने काम करत असतील. आणि अस मिळणारा निधी व्यपगत होत असेल तर साहेब याच्यात मला तर अस वाटत की, जे संबंधीत अधिकारी कर्मचारी आहे त्यांच्यावर कार्यवाही झालीच पाहिजे. का म्हणुन हे लक्ष नाही घालत याच्यामध्ये सेम कंडीशन अशीच आहे साहेब, सामाजिक न्याय विभागाकडुन सन २०१८-१९ मध्ये आपल्याला दिड कोटी रुपये मिळाले होते. त्यावेळेला आपले बांधकाम विभागाचे तत्कालीन सिटी इंजिनिअर होते. भोळे साहेब यांनी आपल्या सामाजिक न्याय विभागाला वेळेमध्ये NOC उपलब्ध करुन दिले नाही. त्याच्यामुळे ते दिड कोटी रुपये सुध्दा व्यपगत झाले होते. त्याच्यामध्ये मुख्यत्वाने त्या मध्ये पिंप्राळयाचा गट नं.१७६ मधल्या पुलाचे काम होते, प्रभाग क्र.४ मधले शौचालयाचे काम होते. प्रभाग क्र.३ मधील कामे होते.साहेब अश्या पध्दतीने इतक्या मोठया प्रमाणावर निधी जर का लॅप्स होत गेले, आपले अधिकारी कर्मचारी वेळेत काम न केल्यामुळे तर साहेब याच्यामध्ये मला असे वाटते की, याच्या मध्ये जर कोणी निष्काळजीपणा करत असेल. तर संबंधीतांवर नक्कीच कार्यवाही झाली पाहिजे. त्या शिवाय मला वाटत नाही की, प्रशासनाला जाग येईल.

**मा.आयुक्त :-** निश्चितच सन्मा.उपमहापौर जो मुद्दा मांडत आहे. अग्निशमकचा ५० लाख निधीबाबत, सन्मा.उपमहापौर जे म्हणत आहे ती वस्तुस्थिती आहे की, आपल्याला ५० लाख रुपयांचा निधी जिल्हानियोजन समितीमधुन मंजुर झाला होता. आपण ५० लाखाचे नियोजन करुन महासभेचा ठराव करुन संचालक, अग्निशमन सेवा यांच्याकडे तांत्रिक मान्यतेला पाठविला, आता त्याच्यामधील दोन आईटम असे होते की, टुव्हिलर वरती फायर फायटर अशी एक नविन संकल्पना परंतु त्याला तांत्रिक मान्यता न मिळाल्यामुळे जवळपास १४ लाखाला आपल्याला तांत्रिक मान्यता मिळाली नाही. ३६ लाखाला तांत्रिक मान्यता मिळाली होती. वास्तविक पाहता जेवढयाला तांत्रिक मान्यता मिळाली, तेवढयाचा प्रस्ताव अग्निशमन विभागामार्फत जिल्हाधिकारी महोदयांकडे जर गेला असता तर त्याला ५० लाखच्या ठिकाणी ३६ लाख तरी मिळाले असते. परंतु केवळ ५० लाखाच्या उर्वरित याला तांत्रिक मान्यता मिळाली नाही म्हणुन ज्याला तांत्रिक मान्यता मिळाली तो ही प्रस्ताव पुढे पाठविण्यात आला नाही. आणि ३१ मार्चला तो निधी लॅप्स होऊन जिल्हाधिकाऱ्यांनी तो निधी अन्य महानगरपालिकेला वितरीत केला ही वस्तुस्थिती आहे. त्यामुळे मागच्या वर्षी ३६ लाखाचा निधी आपल्याला कमी मिळाला, पण अस जरी असल तरी या वर्षासाठी मागच्या वर्षी जो निधी आपल्याला मिळु शकला नाही. तो प्रस्ताव आणि या वर्षाचा नविन प्रस्ताव अशी आपण सन्मा.पालकमंत्री यांना आणि जिल्हाधिकारी यांना DPDC मार्फत विनंती करुन या वर्षी अधिक निधी मिळविण्यासाठी प्रयत्नशील आहोत. तथापी जो निधी आपण वेळेमध्ये प्रस्ताव पाठविलेला नाही म्हणुन आपल्याला मिळु शकला नाही. याची जबाबदारी आपण निश्चित करु .आणि असे जर कोणी हलगर्जीपणा करत असेल, प्रशासकीय निधीच्या बाबतीमध्ये तर त्यांच्यावर आपण शिस्तभंगाची कार्यवाही निश्चित करु.

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब मला असे वाटते की, आता आपण जे सांगत आहे, ते भविष्यामध्ये व येणाऱ्या काळामध्ये पालकमंत्र्यांकडे किंवा DPDC चे आपले सन्मा.सदस्य नितीन भाऊ पण आता DPDC मध्ये आहेत. या सर्वांच्या माध्यमातुन आपण आता जरी मागणी केली तर साहेब आता शासनाच्या नियमानुसार मागच्या वेळेस जो सिल झालेला निधी असतो. तो पुढच्या वर्षी भेटण्यासाठी, आपल्याला ही कदाचित त्याची माहिती आहे की, त्या विषयासाठी किती त्रास होतं. आपल्याला जे ५० लाख रुपये मिळाले होते आणि त्या सोबत आपला जो प्रशासनाचा ठराव गेलेला होता. इन्स्ट्रुमेंट खरेदी करण्याबाबतीत सायमलटेनियसली माझा एक ठराव पाठविलेला होता. पिंप्राळा भागामध्ये अग्निशमन दल उभारण्यासाठी, आणि साहेब त्याच्यासाठी टी.एस.ची महासंचालकाची गरज नव्हती. तो प्रस्ताव जर आपला वेळेत पाठविला जात नव्हता तर त्याच्या

ऐवजी माझ्या पिंप्राळा भागात अग्निशमन विभागाकडुन बिल्डींग कन्स्ट्रक्शनसाठी किंवा त्याठिकाणी फायरस्टेशन उभारण्याच्या संदर्भातला प्रस्ताव का नाही पाठविला गेला. त्याच्यासाठी तर काही टी.एस.ची गरज नव्हती. आणि माझ्या माहितीनुसार सहाय्यक संचालकांचा टी.एस.फक्त आपण जर वाहन खरेदी करत असु किंवा चेसीस खरेदी करत असु फक्त त्यासाठी टेक्नीकल सॅन्कशन आपल्याला लागत असतो. जर का आपण अन्य कुठलेही इक्व्हीपमेंट खरेदी करत असु तर मला नाही वाटत साहेब की, आपल्याला मुंबईच्या किंवा पुण्याच्या सहाय्यक संचालकांच्या मान्यतेची गरज आहे. साहेब दोन्ही विषय वेगवेगळे आहे. जर वेळ लागत होती, तर आपल्याला वेळेमध्ये जो फायरसाठी निधी आलेला होता तो आपण आपल्या कन्स्ट्रक्शनसाठी सुध्दा वापरु शकत होतो.जर आपल्याला तो वेळेत मिळत होता. आणि आपण टी.एस.त्याचा वापर करु शकत नव्हतो. तर आपल्याला वेळेत टी.एस.करणे गरजेचे होते. दोन्ही बाबी वेगवेगळया आहेत. माझा म्हणायचा अर्थ फक्त इतकाच आहे. याच्यात फक्त निष्काळजीपणा होत आहे. शासनाकडुन मिळालेल्या निधीचा काही विनियोग होत नसेल. असे झालेले आहे आता की, कुठलाही कर्मचारी अधिकारी याला असा वाटायला लागल आहे की, हे काही माझ्या घरच काम नाही म्हणुन हे मी कशाला कराव. आणि सगळे निष्काळजीपण्याने काम चालु आहे. असे मला वाटत अश्या निष्काळजीपण्याने हे काम जर चालत राहिल साहेब तर जळगांव शहराचा विकास तुम्ही आम्ही कितीही प्रयत्न केले, तर तो कधीच भरुन निघणार नाही.

**मा.आयुक्त :-** नाही, निश्चितच, कुठल्याही विभागाकडुन याच्यामध्ये निष्काळजीपणा किंवा दुर्लक्ष होणार नाही याची खबरदारी घेऊ. तांत्रिक मान्यतेचा मुद्दा आहे, आपण कालच याच्या विषयावर चर्चा केली, कुठल्याही कामाला प्रशासकीय मान्यता घेण्यापुर्वी तांत्रिक मान्यतेची आवश्यकता असते. त्यामुळे या बाबतीमध्ये आपल्याला तांत्रिक मान्यता वेळेमध्ये घेणे ही आपली जबाबदारी आहे. केवळ तांत्रिक मान्यता वेळेत मिळाली नाही म्हणुन निधी लॅप्स होणे ही आपल्याला निश्चितच. यापुढच्या काळामध्ये याची निश्चित खबरदारी तर घेऊच परंतु हा जो मागच्या वर्षाचा निधी म्हणालात ही वस्तुस्थिती आहे की, मागच्या वर्षाचा निधी लॅप्स झाल्यानंतर पुढच्या वर्षी मिळत नाही. परंतु आपल्याला मागच्या वर्षी निधी मिळु शकला नाही म्हणुन आपण या वर्षी ज्यादा निधीची मागणी आपण करु या. सुदैवाने आपले स्थायी समितीचे सन्मा.सदस्य श्री.नितीनभाऊ लढ्ढा DPDC मध्ये आहेत. त्यांच्यामार्फत आपण याच्यासाठी प्रयत्न करु. आणि आपल्याला या वर्षी DPDC च्या चालु वर्षाच्या निधी मधुन जास्त निधी मिळविण्याचा आपण प्रयत्न करु या. अर्थातच मागच्या वर्षी जो प्रस्ताव गेला नाही, मी म्हटल्याप्रमाणे आपण जबाबदारी निश्चित करु.

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब, आणि दुसरा विषय जो होता आपल्याला सामाजिक न्याय विभागाकडुन मागच्या सन २०१८-१९ मध्ये काही तरी ८० लक्ष रुपये मिळाले होते. ते सुध्दा पैसे आपले लॅप्स झालेले आहे. ४ महिन्यापर्यंत आपण त्या कामांची NOC देऊशकलो नाही. आपल्याला सामाजिक न्याय विभागाकडुन पत्र प्राप्त होते. सदरील कामे हे दुसऱ्या कुठल्याच निधी मध्ये मंजुर झालेले नाही व ज्या जागेवर आपण काम करतो आहे ती महानगरपालिका क्षेत्रातील जागा आहे. अश्या पध्दतीचे आपल्याला एक पत्र द्यायचे होते.परंतु संबंधीतांना ४ महिन्यापर्यंत पत्र दिले गेले नाही म्हणुन तो पण निधी लॅप्स झालेला आहे. त्याची देखील चौकशी या अनुषंगाने व्हावी असे मला वाटत, आणि जे दोषी असतील त्यांच्यावर कार्यवाही करण्यात यावी.

**मा.आयुक्त :-** निश्चित.

**श्री.नितीन लढढा :-** आयुक्त महोदय, खरं आहे उपमहापौर जे म्हणत आहे ती गंभिर बाब आहे की, एकीकडे निधीची उपलब्धता नाही, सदस्य आपल्या वेगवेगळया प्रयत्नांच्या माध्यमातुन निधीची उपलब्धता करुन आणण्याचा प्रयत्न करतात. फक्त आपल्या प्रशासनातील काही अधिकाऱ्यांच्या कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपण्याने अश्या पध्दतीने जर कधी निधी व्यपगत होत असेल किंवा निधी महानगरपालिकेला उपलब्ध होण्यासंदर्भात अडचणी निर्माण होत असतील. तर निश्चितपणे ही गंभिर बाब आहे. काय होऊन जातं की, महासभेला असो किंवा स्थायी समिती सभेला प्रशासनाकडुन अश्या पध्दतीने अश्वासित केले जाते. परंतु या आश्वासनाची पर्तता होतांना दिसत नाही. किंवा अश्या पध्दतीने अधिकाऱ्यांवरती कोणाच्याही याच्यावरती तो आन्सरेबल आहे या गोष्टीसाठी अश्या पध्दतीची जबाबदारी निश्चित होत नाही. परंतु जबाबदारी जो पर्यंत निश्चित होणार नाही. तो पर्यंत मला वाटत, आश्वासनाशिवाय पदरात काहीच पडणार नाही.

**मा.आयुक्त :-** या पुढच्या काळामध्ये दक्षता घेऊ आपण या गोष्टींची.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.३३६ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.संकीर्ण-११९८/प्र.क्र.३०/नवि-०४ दि.२१ मे, २०२१ अन्वये नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना मंजुर निधीच्या विनियोगासबंधी सन २०१६-१७, सन २०१७-१८, सन २०१८-१९ व सन २०१९-२० या आर्थिक वर्षामध्ये राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थाना नगर विकास विभागामार्फत वितरीत केलेल्या निधीच्या अनुषंगाने कामे पुर्ण करुन निधी खर्च करण्यास दि.२८ फेब्रुवारी,२०२० पर्यंत मुदत वाढ देण्यांत आलेली आहे.

तसेच सन २०१५-१६ व त्यापुर्वीच्या वर्षात नगरविकास विभागामार्फत वितरीत करण्यांत आलेल्या व अदयाप अखर्चित असलेला निधी तात्काळ शासनास जमा करण्यांत यावा याबाबत निर्देश देण्यांत आलेले आहे.

सदर महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडील शासन निर्णय क्र.संकीर्ण-११९८/प्र.क्र.३०/नवि-०४ दि.२१ मे, २०२१ ची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- लढ्ढा नितीन बालमुकूंद**

**अनुमोदक :- सोनवणे मुकुंदा भागवत**

**नगरसचिव :- विषय क्र. ३**:- मनपा निधी अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत जळगांव शहर महानगरपालिका १७ मजली प्रशासकीय इमारतीत व इतर मनपा मालकीच्या मिळकती ठिकाणी सुरक्षारक्षक पुरविणे कामास मक्तेदार शिवा सिक्युरिटी सर्व्हिसेस,जळगांव यांचे दरमहा प्रति सुरक्षारक्षक प्रमाणे रक्कम रु.१५,३३१/- मात्रचे आलेले दरास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय, संबंधीत विषयामध्ये आपल्याला मिनिमम वेजेसनुसार एकच फक्त शिवा सिक्युरिटी सर्व्हिसेस जे आपल्याला धुळे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळद्वारा सहाय्यक आयुक्त कामगार आयुक्त कार्यालयाकडुन जो अधिनियम कामगार अधिनियमानुसार जो कायदा लागु होत. त्याच्यामध्ये फक्त शिवा सिक्युरिटी सर्व्हिसेस हा त्याच्यामध्ये बसतो. आणि इतर जे चौघे लोक आहेत. यांचे जे टेन्डर आपल्याकडे आलेले आहे. आपण एल-१ आणि एल-२ उघडली आणि ते बघितले असता. ते तिघेही लोक यासाठी अपात्र ठरतात.म्हणुन संदर्भीय पुर्ण प्रोसेस करण्यासाठी तिन निविदा धारक असणे गरजेचे असल्या कारणाने याच्यासाठी हे टेन्डर किंवा ही निविदा रिकॉल करण्यात यावी.

**श्री.मुकुंदा सोनवणे :-** प्रस्ताव मान्य आहे. माझे अनुमोदन आहे.

**मा.सभापती :-** या विषयामध्ये.

**श्री.नितीन लढढा :-** पुढचे विषय घ्या.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** मा.सभापती महोदय,

**मा.सभापती :-** बोला ताई.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** हा जो विषय आलेला आहे. त्याची मुदत कधी संपलेली आहे या टेन्डरची. याची संबंधीत अधिकाऱ्यांनी संपुर्ण माहिती द्यावी.

**मा.सभापती :-** सिक्युरिटीचा विषय.

**शहर अभियंता, श्री.अरविंद भोसले :-** दि.३०/११/२०२० ला पुर्ण झाली होती.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** दि.३०/११/२०२० ला पुर्ण झाली होती. आता हा कुठला महिना चालु आहे साहेब. आजची तारीख काय आहे साहेब, दि.२९/०६/२०२१ मग इतकी उशिरा निविदा येण्याचा कारण काय हा विषयाचा ?

**शहर अभियंता, श्री.अरविंद भोसले :-** टेन्डर प्रसिध्द ही जवळपास डिसेंबर अखेरला झालेले आहे. त्यानंतर कार्यवाही करण्यामध्ये २ ते ३ महिने गेले. लिपीक रिटायरमेंटला असतांना ते रजेवर गेले. तर बांधकाम विभागाकडे एकच लिपीक असल्यामुळे जास्तच लोड होता. त्यामुळे या कामाला विलंब झाला. आणि बरेच

जण पॉझिटीव्ह होते. मुख्यलेखा अधिकारी, मुख्यलेखापरिक्षक पण पॉझिटीव्ह होते. याच्यात थोडा वेळ गेलेला आहे कामाचा. आणि डॉकेट पाठविले आम्ही ३१/०५/२०२१ ला. आणि मिटींग आज होत आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** साहेब असे विषय उशिराच येतात. कारण मागच्या वेळेस पण हा विषय झाला होता. आयुक्त साहेबांनी मिटींग मध्ये शब्द दिला होता की, अस आता पुढच्या वेळेला होणार नाही. ठिक आहे आम्ही मान्य करतो, पॉझिटीव्ही आहे परिस्थिती आताची परिस्थिती वाईट आणि गंभिर आहे. याला आपण सर्व जण तोंड देत आहे. पण वारंवार जर प्रत्येक वेळी विषय लेटच येत गेले. मग ते कोणत्या पध्दतीने बरोबर आहे का?

**शहर अभियंता, श्री.अरविंद भोसले :-** ताई लेट झालेले आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** म्हणजे वेळ निघुन जाते आणि त्यानंतर ते सगळे विषय येतात.एकदा होते दोनदा होते. मागच्या दोन तिन सभांना आयुक्त साहेबांना या विषयावर चर्चा झाली होती. साहेब म्हटले याच्यापुढे हा विषय होणार नाही. पण वारंवार परत हे विषय येतात उशिराचे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** ताई, या करीता दर आठ आठ दिवसाला मिटींग घेतली पाहिजे स्थायीची.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** भाऊ, मान्य आहे आठ आठ दिवस, पण हा पाच सहा महिन्याचा विषय आहे ना. मान्य आहे आठ आठ दिवसात पहिले होतच होत्या. पण आता या काही कारणास्तव होत नाही.

**मा.सभापती :-** नवनाथ भाऊ. डिसेंबर नंतरची मिटींग आहे का ही. डिसेंबर ते जुलै याच्यामध्ये किती मिटींग झाल्यात.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आहो साहेब, मी तुमच्या लक्षात आणुन देतो आहे की, जो पर्यंत टेन्डर प्रोसेसींग होत नाही तो पर्यंत आपण या सिक्युरिटी गार्ड वाल्यांना आपण मुदतवाढ दिली. मुदतवाढ दिल्यानंतर.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** मागच्या वेळेला पण मुदतवाढ दिली होती.टेन्डर प्रोसिजर डिसेंबर मध्ये झालेली आहे. आणि डिसेंबर नंतर हा सहावा महिना आहे. इतका उशिरा प्रस्ताव येण्याचे कारण काय ?

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मिटींग नाही व्हायला आज दिड दोन महिने होऊन गेले ना तेव्हा विचारायला पाहिजे होते ना त्यांनी. मिटींग काढली असती तर हे विचारले गेले असते.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** म्हणजे प्रस्ताव उशिरा येणार हे तुम्हाला मान्य आहे. याच्यावरुन असे दिसते की, तुम्हाला मान्य आहे. उशिरा आलेला प्रस्ताव तुम्हाला चालणार आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** मिटींग झाल्यावर आपल्याला कळत ना.

**मा.सभापती :-** नवनाथ भाऊ तुम्ही समर्थन करत आहे का या पाच महिन्यानंतर आलेल्या प्रस्तावाला.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** नाही आम्ही समर्थन नाही करत. तुम्ही मिटींग उशिरा घेत आहे म्हणुन प्रस्ताव तर येईलच ना उशिरा.

**मा.सभापती :-** तुम्ही समर्थन करत आहे का हे स्पष्ट करा.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** समर्थनाचा विषयच नाही आमचा.

**श्री.कुलभुषण पाटील :-** ऐका ना, नवनाथ भाऊ एक मिनीट, सभापती महोदय ते समर्थन नाही करत आहे. ते आपल्या लक्षात आणुन देत आहेत, कदाचित आपण या विषयात जानकार आहात.मला अस वाटत. आपल्याकडुन असे बोलणे जरा उचित नाही होणार कारण आपण मागच्या स्टँडींगच्या मिटींग मध्ये जो पर्यंत पुढच टेन्डर रिकॉल होत नाही. किंवा पुढची निविदा प्रक्रिया पुर्ण होत नाही. तो पर्यंत शिवा सिक्युरिटी सर्व्हिसेस यांना मुदतवाढ देण्यासंदर्भामध्ये,

**मा.सभापती :-** मी सांगतो, ऐका ना.

**श्री.कुलभुषण पाटील :-** ऐका ना, ऐका ना, फक्त ५ मिनीट माझे ऐकुन घ्या. कदाचित आपल्या अध्यक्षते खाली जी मिटींग झाली होती. त्याच्यात अस ठरविल गेल होत की, ही निविदा प्रक्रिया पुर्ण होईपर्यंत शिवा सिक्युरिटी सर्व्हिसेस यांनाच मुदतवाढ देण्यात यावी.असा प्रस्ताव आपण मान्य देखील केला होता सर्वानुमते आणि आपणच आज जर अस म्हणत असाल. समर्थन देत आहात का ? तर आमचा या विषयाला नक्कीच विरोध राहणार आहे. परंतु तुमच्या लक्षात आणु ईच्छितो की, जी मिटींग दर आठवडयाला झाली पाहिजे. दर आठ दिवसाने झाली पाहिजे किंवा किमान १५ दिवसात झाली पाहिजे.ती मिटींग जर दोन दोन तीन तीन महिन्यापर्यंत होत नाही. त्याच्या अनुषंगाने असे जे विषय आहे ते कुठेतरी धुळ खात पडत आहे. आणि त्याच्याने सर्वांच चालत आहे. मग आमचे म्हणायचे असे आहे की, आपण या सर्व गोष्टींशी समर्थन करीत आहेत का? आपण समर्थन करत आहेत का या सर्व गोष्टींला ? आपल्या आड येऊन आपण हे विषय दाबुन ठेवत आहेत का ? म्हणजे संबंधीत निविदा धारकाला किंवा संबंधीत मक्तेदाराला त्याचा कुठेतरी फायदा होईल असा आम्हाला वाटायला लागले आहे. मिटींग न घेण्याचे कारण काय ?

**मा.सभापती :-** तुमचे बोलणे झाले असेल तर मला बोलु द्या आता.

**श्री.कुलभुषण पाटील :-** असे जे विषय आहे हे स्टॅण्डींग मध्येच येतात.

**मा.सभापती :-** तुमच बोलुन झालं असेल तर मी सांगतो तुम्हाला. मागची आपण मुदतवाढ दिली तर कश्यासाठी दिली होती. ही प्रक्रिया राबविण्यासाठी जो पिरेड लागणार आहे. तेवढयासाठी, प्रक्रिया राबविण्यासाठी सहा सहा महिने लागतात का ? प्रक्रिया राबविण्यासाठी ६ महिने लागत नाही.

**श्री.कुलभुषण पाटील :-** प्रक्रिया राबविण्यासाठी सहा महिने लागत नाही, भोसले साहेब आपल्याकडे बसलेले आहे. ज्यांनी प्रक्रिया राबविली ते आपल्या बाजुलाच बसलेले आहे. आपण आपल्या बाजुला विचारु न घ्या भोसले साहेबांना ही प्रक्रियेचे डॉकेट कधीच तयार आहे. परंतु संबंधीत विषयासाठी स्टॅण्डींगची सभा घेणे आवश्यक आहे. स्टॅण्डींग सदस्यांचे त्याच्यासाठी अनुमोदन येणे गरजेचे आहे. विषय स्टॅण्डींगमध्ये मंजुर होणे गरजेचे आहे. असे असल्या कारणाने तो विषय पेन्डींग पडलेला होता. माझ्या माहितीनुसार बरोबर आहे का भोसले साहेब हा विषय.

**शहर अभियंता, श्री.अरविंद भोसले :-** दि.२१/०५/२०२१ ला डॉकेट गेलेले आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** बरोबर आहे की नाही, हा उशिरा का आला विषय. स्टॅण्डींगची मिटींग झाली नाही म्हणुन तो विषय आता आला. मध्येच कसे काय मंजुर करतील ते.

**मा.सभापती :-** दि.२१/०५/२०२१ रोजी तो फक्त एकच डॉकेट होत. एका डॉकेटसाठी रु.१७०००/- खर्च करायचे का महानगरपालिकेचे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** रु.१७०००/- कशासाठी खर्च होतात.

**मा.सभापती :-** तुम्हाला माहिती आहे का ऑनलाईन सभेसाठी खर्च किती होते.

**श्री.कुलभुषण पाटील :-** हे बघा विषय ऑनलाईन सभेसाठी किती खर्च होते. त्यापेक्षा म्हणजे जळगांव शहरातील नागरीकांच्या समस्यापेक्षा रु.१७०००/- ही किंमत जास्त आहे का ? तुम्ही जळगांव शहर वासियांच्या सुविधांची पैश्यांमध्ये किंमत करु शकत नाही. सन्मा.सभापती महोदय, जळगांव शहर वासियांच्या व महागरपालिकेच्या हिताच्या संदर्भात आपण त्याची किंमत पैश्यांमध्ये मोजु शकत नाही. ही शौकांतीका आहे की, आपण या गोष्टी पैश्यांमध्ये मोजत आहे.

**मा.सभापती :-** सर्व सन्मा.सदस्यांना आधी विनंती करतो की, आपण माहिती घ्यावी. माहिती घेतल्यानंतर आरोप करावे. शासनाचे काय निर्देश आहे त्याची माहिती घ्या आधी.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय, मला अस वाटतं की, आपण या विषयाची माहिती घ्यावी. आणि त्याच्यामध्ये विलंब झाला त्याची सुध्दा माहिती घ्यावी. आणि कशामुळे विलंब झाला याची देखील माहिती घ्यावी. आपण जर ते आत्मसाद केले. तर मला असं वाटत नक्की याच्यातुन आरोप प्रतिआरोप करण्यापेक्षा कामामध्ये सुसुत्रता येईल व कामे जी आहे ती लवकर होतील.

**मा.सभापती :-** मग आपण आता मुळ विषयाकडे येऊ या.

**श्री.कुलभुषण पाटील :-** बिलकुल बिलकुल फक्त आमचा सांगण्याचा अर्थ इतकाच आहे. आमचे सदस्य फक्त यासाठी आक्रमक होता की, काही कामे वेळेत होत नाही. त्यासाठी होत काय बाकी दुसरं काही विषय नाही आमचा.आम्हाला राजकारण करायच नाही. आरोप प्रतिआरोप करायचे नाही.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** तुम्ही आक्रमक झाले तर आम्ही प्रश्न विचारायचे नाही असे आपले म्हणणे आहे का ?

**श्री.कुलभुषण पाटील :-** ताई तो तुमचा अधिकार आहे. सभागृहात प्रश्न विचारणे, तेथे आपले मत मांडणे, स्टॅण्डींग मध्ये आपले मत मांडणे ते आपले निश्चितच अधिकार आहे. आणि आपले अधिकार कोणीही हिराऊ शकत नाही. आपण आपला मत निश्चित मांडु शकतात.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** मला शंका आली थोडी म्हणुन मी विचारल. याच्यामध्ये इतक हे नाही. तुम्ही पण पहिले बोलले ना. पहिल्या विषयाला तुम्हीपण बोलले.

**श्री.कुलभुषण पाटील :-** आपला अधिकार आहे आपण आपला मत मांडु शकतात. हरकत नाही त्याच्यामध्ये.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** प्रश्न विचारणे हे आमचे कामच आहे ना.

**श्री.नितीन लढ्ढा :-** घ्या सभापती महोदय दुसरा विषय घ्या. बरीच चर्चा झाली.

**श्री.कुलभुषण पाटील :-** या विषयामध्ये संबंधीत टेन्डर रिकॉल करण्यात यावे.

**मा.सभापती :-** उज्वलाताई पण तुमच्या समर्थनार्थतच बोलले ते काही तुमच्या विरोधात बोललेले नाही.

**श्री.कुलभुषण पाटील :-** नक्की, नक्की. राजु भाऊ ऐकुन घ्या मी ताईंना काय सांगितले. मी ताईंना सांगितले की, हे आपले अधिकार आहे. आणि आपण आपल्या अधिकारात चर्चा केलीच पाहिजे.

**मा.सभापती :-** नक्कीच नक्कीच. चर्चा सकारात्मकच झाली पाहिजे, चर्चा विरोधात्मक नको.

**श्री.कुलभुषण पाटील :-** हा विषय विरोधाचा नाही भाऊ, विषय विलंबाचा आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदय, मला एक म्हणायचे आहे.

**मा.सभापती :-** रिकॉल करायचा आहे ना टेन्डर.

**श्री.नितीन लढ्ढा :-** टेन्डर रिकॉल करा.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय, टेक्नीकली अडचण त्याच्यामध्ये अशी आहे. आपल्याला मासिक किमान वेतन अधिनियम १९४८ नुसार आपल्याला ज्या ४ नविदा प्राप्त झाल्या आहेत. फक्त एक निविदा धारक त्यामध्ये कायद्यात बसतो. आणि तिन निविदा धारक त्याच्या मध्ये बसत नाही. आणि आपल्याला निविदा करत असतांना आपल्याला किमान ३ निविदा धारक किमान दोन निविदा धारक असणे गरजेचे आहे. त्याच्या मध्ये फक्त एक प्रथमिक निविदा धारक असणार म्हणुन टेक्नीकल ते बसत नाही. कायद्याने ते असे आहे. मला अस वाटत की, याच्यावर भोसले साहेबांनी उत्तर द्यावे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदय, हा सेक्युरिटीचा टेन्डर काढण्यापुर्वी मला वाटत की, जळगांव शहर महानगरपालिकेने आपल्या आस्थापना विभागाच्या माध्यमातुन असे किती अतिरिक्त कामगार आपल्याकडे आहे की, जेणे करुन या सुरक्षा रक्षकांच्या जबाबदारी त्यांच्यावर सोपवुन महानगरपालिकेवरती अतिरिक्त पडणारा भार. हा सुध्दा कमी करता येऊ शकतो का ? याच्या संदर्भातही मा.आयुक्तांनी अभ्यास करावा. आणि तश्या पध्दतीने या निविदा प्रक्रिया राबविण्यापुर्वी सुरक्षारक्षकांची खऱ्या अर्थाने गरज आहे का ? की आपल्याकडे असलेले कर्मचाऱ्यांच्या माध्यमातुन सुध्दा अश्या पध्दतीचा महानगरपालिकेचा आर्थिक बोझा कमी करता यऊ शकेल का ? याच्या संदर्भातला संक्षीप्त अहवाल सादर करावा. आणि तद्नंतरच याच्या बाबतीत निर्णय घ्यावा.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.३३७ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, मनपा निधी अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत महानगरपालिका १७ मजली प्रशासकीय इमारतीत व इतर मनपा मालकीच्या मिळकती ठिकाणी सुरक्षारक्षक पुरविणे कामी प्रशासनाने तात्काळ पुन्हा नविन निविदा प्रकिया राबवावी व सविस्तर अहवाल स्थायी समिती सभेपूढे सादर करावा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- सोनवणे मुकुंदा भागवत**

**नगरसचिव :- विषय क्र.** ४:- कोविड-१९ कालावधीतील (दि.२२/०३/२०२० ते दि.१५/१०/२०२०) दैनिक बाजार शुल्क वसुली बाबतच्या अहवालास मान्यता देणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.मुकुंदा सोनवणे :-** प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर योग्य तो निर्णय घेणे, माझे अनुमोदन आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.आयुक्त महोदय,

**सौ.ज्योती चव्हाण :-** सभापती महोदय,

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.आयुक्त महोदय, या विषयाच्या संदर्भात संपुर्ण डॉकेटचा अभ्यास केला, याच्या मध्ये बऱ्याच गोष्टी कुठेतरी संशयास्पद किंवा तफावती वाटतात की, कर्मचाऱ्यांनी केलेला सर्व्हे आणि काढलेल्या अंदाजाची जी सरासरी आहे. त्या सरासरीच्या अनुषंगाने मला वाटत ज्या पध्दतीने सर्व्हे झालेला असेल. त्या पध्दतीने प्रशासनाने पुन्हा सर्व्हे केल्याची सर्व कागदपत्र या डॉकेट सोबत जोडलेली दिसुन येत नाही. फक्त सर्व्हे केल्याची आकडेवारीचा एक तक्ता जोडण्यात आलेला आहे की, या या महिन्यामध्ये अश्या पध्दतीने सर्व्हे झालेला आहे. आणि त्याच्यावरुन हॉकर्सची संख्या निर्धारीत करण्यात आल्याची दिसुन येते. तर या संदर्भात प्रशासनाचा जो सविस्तर सर्व्हे झालेला असेल. त्या सर्व्हेच्या कागदपत्रांसह हा विषय पुढच्या स्थायी समितीच्या सभेसमोर ठेवावा अशी विनंती आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** मला प्रशासनाला विचारायचे आहे की, त्यांना कस हे जमणार आहेत. त्यांची वसुली म्हणजे सहा महिन्याची मुदतवाढ त्यांना अपेक्षित आहे. त्यांच म्हणण काय आहे आयुक्त साहेबांना बोलु द्या या विषयावर.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मुदतवाढ तर नाकारण्यात आलेली आहे ताई.

**सौ.ज्योती चव्हाण :-** आणि जो फरक आहे. त्याच्या बद्दल काय ठरविले प्रशासनाने.

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्या फरकच्या बाबतीतली जी संक्षीप्त माहिती अपेक्षित आहे ती डॉकेट सोबत दिसुन येत नाही. एका कोष्टका मध्ये आकडेवारी दिल्याचे दिसुन येते. परंतु या संदर्भात सर्व्हे झालेला असेल प्रत्येक्षात झालेला सर्व्हे आणि त्या अहवालाची प्रत सुध्दा याच्यात जोडण्यात यावी. आणि ती जोडुन नंतरच पुढच्या स्थायी समितीच्या सभेसमोर हा विषय ठेवण्यात यावा. अशी माझी विनंती आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** आणि तसेच भाऊ जे ३००० हॉकर्स त्यांनी दाखविलेले आहे. पुर्ण जळगांव शहरात किती हॉकर्स आहे. ३००० हॉकर्स आहेत का ? हे आपल्यालाही कळत आहे की नाही. याचा पुर्ण सर्व्हे झाला पाहिजे.

**मा.सभापती :-** विषय तहकुब ठेवायचा का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** संपुर्ण ताई जे विचारत आहे त्या पध्दतीने आणि मी जी उपस्थित केलेली माहिती आहे. या अनुषंगाने संपुर्ण माहितीसह पुढच्या स्थायी समिती सभेसमोर हा डॉकेट परत ठेवण्यात यावे. तो पर्यंत विषय तहकुब करण्यात यावा.

**सौ.ज्योती चव्हाण :-** तहकुब ठेवावा हा विषय.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ३३८ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, दैनिक बाजार शुल्क वसुली कामी मक्तेदार यांनी केलेली मुदतवाढीची मागणी अमान्य करणेत येत आहे. प्रशासनाने प्रस्तावा सोबत सर्व्हे केलेली कोणतेही कागदपत्र जोडलेली नाहीत. प्रशासनाने सर्वे केलेल्या अहवालाची संपुर्ण कागदपत्रांसहीत माहीती पूढील स्थायी समितीच्या सभेत सादर करावी. तोपर्यंत सदरचा विषय तहकूब ठेवण्यात येत आहे.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- लढ्ढा नितीन बालमुकूंद**

**अनुमोदक :- सोनवणे मुकुंदा भागवत**

**नगरसचिव :- विषय क्र. ५:-** अतिक्रमण निर्मुलन विभागाकडेस १० मजुर दोन महिन्याकरिता पुरविणे कामी मंजुर दर प्रति कामगार रु.५२९.०१/- याप्रमाणे एकूण ६० दिवसासाठी येणारा एकूण खर्च रक्कम रु.३,१७,४०६/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सदर प्रस्ताव मान्य आहे.

**श्री.मुकुंदा सोनवणे :-** प्रशासनाकडुन आलेल्या विषयावर विचार करुन निर्णय घेणे. माझे अनुमोदन आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** विषय क्र. ५ आणि विषय क्र.७ सारखेच आहे.

**मा.सभापती :-** विषय क्र.५, १० मजुर पुरविणेबाबत याच्या मध्ये जे आहे अमरावतीचे ठेकेदार आहेत, यांची मुदत किती तारखेपर्यंत आहे ठेक्याची. मग यांच्याकडुन कसे, मुदत संपल्यानंतर ठेका परत करणार का १० मजुरांचा. **सौ.ज्योती चव्हाण :-** सभापती स्वत: माहिती घेत आहे.

**मा.सभापती :-** माहिती घेतलेली आहे ताई. आता तुमच्या समोर हे करावा लागेल ना.

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** ३ महिन्यासाठी मुदतवाढ दिलेली आहे.

**मा.सभापती :-** ती दिलेली मुदत केव्हा संपली.

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील :-** ३१/०५/२०२१ ला ती मुदत संपली.

**सौ.ज्योती चव्हाण :-** सभापती महोदय,

**मा.सभापती :-** बोला ताई.

**सौ.ज्योती चव्हाण :-** या विषयात ही आपण आस्थापना विभागात आपले अतिरिक्त कर्मचारी किती आहे याचा शोध घेतला पाहिजे. आणि मनपावर दर दोन महिन्याने बोजा होत आहे. आपले अतिरिक्त कर्मचारी कुठे गेले

मनपाचे. प्रत्येक विभागाला आपण असे कर्मचारी जर देऊ. तर आपल्या मनपाचा बोझा होत नाही का? प्रत्येक विभागाला जर असे कर्मचारी पुरवत राहु आपण, जर आपले कर्मचारी गेले कुठे.

**मा.सभापती :-** सदरच्या ठेकेदाराची मुदत संपलेली असल्यामुळे सदरची निविदा परत प्रकाशित करावी. असा निर्णय घेण्यात येतो.

**श्री.नवनाथ दारकुंडे** :- अध्यक्ष महोदय, पहिला मुद्दा, हॅलो, हॅलो. अध्यक्ष महोदय,

**मा.सभापती :-** बोला.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अमरावती ठेकेदाराला आपण ४.५ वर्ष कामगार पुरविण्याचा कोविडच्या धरतीवर टेन्डर दिले होते. त्यांनाच मजुर पुरवायचा अतिक्रमणबाबत टेन्डर दिलेल आहे. अतिक्रमणचे जे मजुर पुरवायचे आहे हाच ठेकेदार पुरवित आहे. आणि कोविडच्या संदर्भात जे माणसे पुरवित आहे. त्याची मुदत किती तारखेची आहे त्याची तारीख पहा.

**मा.सभापती :-** तो पण विषय आल्यानंतर बघु ना. त्यातही तिच परिस्थिती आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** तोच ठेकेदार आहे. विषय पहिले व्यवस्थीत समजुन घ्या. मग बोला. बोला पाटील साहेब बोला.

**मा.सभापती :-** मांडाना तुम्हाला काय मांडायचे आहे.

**सहा.आयुक्त, श्री.पवन पाटील** :- सन्मा.सभागृह, कोविड सेंटर साफसफाईसाठी मे.दिपक उत्तराधी, अमरावती मक्तेदाराकडुन आपण कर्मचारी पुरवठा करुन घेण्यात येत आहे. त्यांना पहिले सहा महिने मुदत दिली होती. त्याची मुदत फेब्रुवारीमध्ये संपली. नंतर दि.०१/०३/२०२१ पासुन तिन महिने मुदतवाढ देण्यात आली. ती तिन महिन्याची मुदतवाढ दि.३१/०५/२०२१ ला संपली. मग आता तिसऱ्या लाटेच्या अनुषंगाने आपण परत सहा महिन्याकरीता तेव्हा ज्या खर्चाला मंजुरी घेण्यात आलेली होती. त्याच्यासाठी ६ महिन्याच्या मुदतवाढीचा प्रस्ताव ठेवला आहे. तो विषय ७ नंबरचा आहे. आणि अतिक्रमण विभागाला जे काही अतिरिक्त कर्मचारी लागतात. ते कर्मचारी आपण या मक्तेदाराकडुन त्याच मंजुर दरात घेऊन अतिक्रमण विभागाचे काम करुन घेत आहोत. त्यासाठीचा ५ नंबरचा विषय तो तसा ठेवलेला आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** बरोबर आहे की नाही. हा जो सफाईचा ठेकेदार आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय,

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** बोला भाऊ.

**श्री.कुलभुषण पाटील :-** ऐका ना. नवनाथ भाऊ, सभापती महोदय, काय होत माहिती आहे का ? कुठलाही ठेकेदार किंवा कुठलाही मक्तेदार किंवा कुठल्याही मक्तेदाराचे माणस सदस्यांचे नातेवाईक किंवा भाऊबंध नसतात. परंतु काय असत माहित आहे का ? अतिक्रमणच्या बाबतीत आपल्याला जे काम करायच आहे. सगळी अतिक्रमणची परिस्थीत आपल्याला माहिती आहे. आपले अधिकारी कर्मचारी कुठल्या पध्दतीने काम करत आहे. आणि त्यांना त्रास किती होत आहे. अक्षरश: अतिक्रमण धारकांचे अतिक्रमण काढायला गेले असता आपल्या अधिकाऱ्यांवर काही वेळेस दगड फेक होते काही वेळेस त्यांच्यावर जिव घेणे हल्ले होतात. काही वेळेस त्यांच्या गाडया ट्रॅक्टर पलटी करण्यापर्यंतचे हॉकर्स आणि अतिक्रमण धारक इतकी मुजोरी करतात. अश्या काळामध्ये अश्या अवस्थामध्ये आपल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांजवळ पुरेसे मनुष्यबळ असणे तेवढंच गरजेचे आहे. आता आपल्याकडे जसा आपण मागच्या विषयात ठराव केला, सन्मा.नितीन भाऊंनी जो विषय मांडला सिक्युरिटीच्या बाबतीमध्ये की, आपल्या आस्थापना विभागामधले काही कर्मचारी काढुन जर या विभागात देता आले, आणि मुनुष्यबळ जर आपल्याला या ठिकाणी देता आल, तर तसे देखील प्रयत्न करण्यात यावे. परंतु जर तशी काही अवस्था नसेल, किंवा तशी आपल्याकडे पर्यायी व्यवस्था नसेल. तर मला अस वाटत संबंधीत विषय जर आपण ई-निविदाधारक किंवा ई-निविदा पध्दतीने ते राबविले तर त्याच्यासाठी फार वेळ जाईल. आणि तो पर्यंत आपल्या अतिक्रमण विभागाचे काम आज रोजी चाललेले आहे. ते वापस ठप्प होईल व येणाऱ्या काळात आपल्याला अतिक्रमण काढण्यात त्रास होईल. अस मला वाटत. बाकी निर्णय काय घ्यायचे आहे ते सर्वांनी घ्यायचा आहे. त्याच्याबद्दल वाद नाही. पण आपले प्रशासन काम करत आहे. जी गतीमानता आहे ती आज आपल्या अतिक्रमण विभागात आहे. ते मला वाटते कुठेतरी धिम्या गतीने होईल किंवा मला वाटत ते काम कुठेतरी ब्रेक होईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मला वाटते कुठेतरी सभापती महोदय की, कोविडची परिस्थिती पाहता, ३ महिने मुदतवाढ देणे योग्य होईल आणि मधल्या कालावधी मध्ये प्रशासनाने पुन्हा नविन निविदा प्रक्रिया राबविण्याचे संदर्भातली भुमिका ज्या पध्दतीने आपण प्रत्येक वेळेला बोलतो की, या प्रत्येक गोष्टीला विलंब होत.तो विलंब या

विषयाच्या संदर्भात ही अनुभव येतो. परंतु सद्यास्थिती आणि येणारी कोविडची ३ री लाट डोळयासमोर ठेवता. याच्यावरती मुदतवाढ देणे आजच्या दृष्टीकोणातुन संयुक्तीक होईल. तरी प्रशासनाने त्या बाबतीत विचार करावा.

**मा.सभापती :-** भाऊ, वारंवार आपण ही मुदतवाढ देत असतो. या आधी आपण संबंधीत एजन्सीला आपण मुदतवाढ दिलेली आहे. आणि निविदा प्रक्रिया राबविली जात नाही वेळेवर ती होत नाही. त्याच्यामुळे आपल्याला नाईलाजास्तव सभेला निर्णय घ्यावा लागतो की, यांना मुदतवाढ द्यावी. मागेही आपण मुदतवाढ दिलेली आहे. आपण नविन निविदा प्रक्रिया का राबवत नाही.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आमच म्हणणे तेच आहे की, प्रशासन याच्या बाबतीत जे निष्काळजीपणा करतो. याच्यासाठी आपल्याला सदरच्या विषयासंबंधात निविदा प्रक्रिया राबविण्यासाठी जितका कालावधी लागेल तितकीच मुदतवाढ यांना देण्यात यावी. यापुढची मुदतवाढ देण्यात येऊ नये.

**श्री.कुलभुषण पाटील :-** निश्चित निश्चित, प्रशासनाने संबंधीत विषयामध्ये लवकरात लवकर ई-निविदा करावी.

**मा.सभापती :-** प्रशासनाने लवकरात लवकर नविन निविदा प्रक्रिया राबविण्यात यावी.

**श्री.कुलभुषण पाटील :-** तो पर्यंत संबंधीतांना मुदतवाढ देण्यात येत आहे.

**मा.आयुक्त :-** मा.सभापती महोदय, स्थायी समिती मार्फत जो काही निर्णय होईल. त्याची अंमलबजावणी निश्चितच होईल. स्थायी समिती पुर्ण विचार करुन निर्णय घेईल यात काही शंका नाही. परंतु कुठलाही निर्णय घेण्यापुर्वी त्याची पार्श्वभुमी आपण सगळयांनी समजुन घ्यावी असे मला वाटते. आपण हा जो मुदतवाढीचा विषय म्हणतो आहे तो इतर ठिकाणी संपलेली मुदत आणि या ठिकाणी संपलेली मुदत याच्या मध्ये थोडासा फरक आहे की, जो आपण या निमित्ताने जाणुन घेतला पाहिजे. आपल्या सर्वांना आठवत असेल. मागच्या स्थायी समिती मध्ये सदस्य होते त्यांनी. आपल्याला कोविड मध्ये ज्या वेळेला कोविडच्या कामकाजासाठी विशेष करुन फिल्डवरचे काम असेल किंवा कोविड सेंटरवरचा कामकाज असेल. तिथल्या स्वच्छतेसाठी आणि कोविड रिलेटेड कामकाजासाठी आपल्याकडे महानगरपालिकेकडे वेगळा स्टाफ नाही. म्हणुन आपण त्याच्यासाठी साधारणता रोजचे १२०० ते १३०० जवळपास १५०० कर्मचारी लागतील असे गृहीत धरुन आपण त्याचा इस्टीमेट केले होते. त्यावेळेला ही परिस्थिती होती की, मागच्या जुन जुलै मधली ही परिस्थिती होती. त्यावेळेस साधारणता प्राथमिक अंदाज आपण असा केला होता की, कोविडची परिस्थिती, कोविड सेंटर चालविण्याची एक साधारण ६ महिने चालेल असा अंदाज होता. त्या वेळेला आपल्याला कोणाही हे अंदाज येऊ शकत नाही. दुसरी लाट येणार आहे का तिसरी येणार आहे का ? कोविड किती दिवस चालणार आहे. हे कोणालाच अंदाज नाही. त्यामुळे आपण एक सर्वसाधारणपणे ६ महिने कोविडची परिस्थिती राहील असे गृहीत धरुन रोजच्या १५०० प्रमाणे त्या वेळेच्या दराप्रमाणे, ४ कोटीची मान्यता आपण स्थायी समितीची घेतलेली आहे. आणि हे ४ कोटी रु पये साधारणता ६ महिन्यामध्ये खर्च होईल. अश्या परिस्थितीमध्ये निविदा प्रक्रिया मा.स्थायी समितीने मंजुर केली. आता दुरदैवाने कोविडची परिस्थिती ही ६ महिन्यानंतर पुढे आपली कायम राहील. परंतु अजुन जर आपण बघितल. तर स्थायी समितीने मंजुरी दिलेल्या ४ कोटी पैकी मला वाटत आता सद्या किती खर्च झालेला आहे. आता ४ कोटी पैकी १ कोटी ३ लाख खर्च झाला आहे. साधारणता आपल्या अंदाजाच्या २५ टक्केच खर्च झालेला आहे. स्थायी समितीने मंजुरी दिलेल्या रकमेच्या जवळपास अजुन ही ३ कोटीची रक्कम आपली अखर्चीत आहे. आणि कोविडची परिस्थिती लांबल्यामुळे मुदतवाढ देत आहोत. कोविडची परिस्थिती लांबल्याने फेरनिविदा काढायची का ? मा.स्थायी समिती म्हणत असेल तर काढायला काहीच हरकत नाही. परंतु प्रशासकीय मंजुरीची रक्कम आपल्याकडे अजुन ही शिल्लक असेल आणि कोविडच्या कारणाने आपल्याला याची मुदत वाढवावी लागत असेल तर कामाचा कालावधी वाढविला तरी ही आपण अतिरिक्त खर्चाला मान्यता घेत नाही. अतिरिक्त खर्च हा आपल्याला होत नाही. ४ कोटी रुपयाच्या खर्चामध्ये आपले अजुन ही किती दिवस काम चालणार आहे. मुद्दा नंबर २ आता याच्या मध्ये बऱ्याच सदस्यांकडुन अशी विचारणा होते की, तुम्ही अतिक्रमणच्या कामासाठी वेगळी निविदा काढत नाही का ? अतिक्रमणच्या कामाची या गेल्या वर्षभरात जर परिस्थिती बघितली.ते अतिक्रमण विभागाचे श्री.वाहुळे हे चांगल्यापैकी सांगत असतील आपल्याला. दैनंदिन अतिक्रमण विभागामधल्या कामी आणि मागच्या दैनंदिन अतिक्रमण विभागामधील काम आणि मागच्या मार्च नंतर चाललेल्या अतिक्रमण विभाग कोविड संदर्भामध्ये जिल्हाधिकारी किंवा राज्य शासनाचे बंधन घातलेले आहे. या बंधनाची अंमलबजावणी या शहरामध्ये पोलिस

प्रशासन आणि स्वराज्य संस्थावर टाकलेली आहे. त्यामुळे दुकाने लवकर बंद होतात किंवा नाही. गर्दी होत असेल तर. जी दुकाने आस्थापना वेळेनंतर चालु राहतात त्यांच्यावर कार्यवाही करणे. मास्क न लावणे असेल त्याच्यावर कार्यवाही करणे. ही आपली अतिरिक्त कामे जी आहे ती फक्त कोविडमुळे वाढलेली आहे. मग अश्या वेळेला कोविडच्या कामासाठी हे सगळे काम आपण फिल्डवरच अतिक्रमण विभागाकडे आहे. म्हणुन ते कोविड संबंधीत काम असल्यामुळे कोविडसाठी जी आपण निविदा काढलेली आहे. त्या निविदा धारकाकडुन आपण घेत आहे. अदरवाईज आपल्याकडे आरोग्य खात्याला पुरविण्याची एक निविदा आहे. पुर्वीच्या काळामध्ये बांधकाम विभागाकडे लागणारे मजुर पुरविण्याची एक निविदा होती. परंतु हे काम कोविडशी संबंधीत आहे. जरी अतिक्रमण विभागामार्फत असलं. तरी कोविड संबंधीत कामकाज असल्यामुळे आपण कोविडसाठी जो मजुर पुरविणारा जो ठेकेदार आहे. ज्याची अजुन ही सांगिल्याप्रमाणे १ कोटी खर्च झालेला आहे, ३ कोटीची रक्कम आपली शिल्लक आहे. आणि कोविडच्या काळामध्ये निविदा मध्ये वेळ घालविणे आज आपण बघितलेले आहे. मागच्या आठवडयामध्ये परिस्थिती अशी होती. आता जवळपास आपल्याकडची सगळी बंधने संपली. पण अचानकपणे नविन जो स्ट्रेन आला. त्याच्यामुळे या सोमवारपासुन पुन्हा बंधने चालु झालेली आहे. आता या सर्व पार्श्वभुमीवर तिसरी लाट केव्हा येईल. कधी येईल.आपल्याला सांगता येणार नाही. अश्या वेळेला आपली यंत्रणा ही रेडी असावी. अश्या भुमिकेतुन आपण या दोघांचाही आपण मुदतवाढीचा प्रस्ताव ठेवलेला आहे. ही पार्श्वभुमी विचारात घेऊन म. स्थायी समितीने निर्णय घ्यावा की, जेणे करुन आपल्याला अनियमितता ही होणार नाही. आणि महापालिकेच्या दैनंदिन कामकाजामध्ये विशेष करुन कोविड ॲपरॉप्रियेड बिहेवीयर च्या अंमलबजावणी मध्ये कुठल्याही प्रकारच्या आपल्याला फिल्डवरच्या कामांमध्ये अडचण निर्माण होणार नाही. या दोन्हीचा विचार करुन आपल्याला निर्णय घेणे योग्य राहील अस मला वाटत. अदरवाईज स्थायी समिती जो निर्णय घेईल. त्याची आपल्याला अंमलबजावणी करावी लागेल. काही सन्मा.सदस्यांनी असाही मुद्दा मांडला, मला वाटत चव्हाणताईंनी हा मुद्दा मांडला की, आपल्याकडे अतिरिक्त कर्मचारी आहेत. महानगरपालिकेमध्ये आपण बघत आहे की, कर्मचाऱ्यांची ऐवढया मोठया प्रमाणावर शॉर्टेज आहे. अश्या वेळेला अतिरिक्त कर्मचारी हा तर विषयच येणार नाही. म्हणुनच आपल्याला हे कर्मचारी वेगळवेगळया फिल्डवरचे घ्यावे लागतात. इतर कॅडरमधले कर्मचारी अतिरिक्त असतील. त्यांना आपल्याला अतिक्रमण मध्ये मजुर म्हणुन काही पाठविता येणार नाही. त्यामुळे या सर्व मर्यादा विचारात घेऊनच आपण कर्मचाऱ्यांची आवश्यकता निश्चित करत आहे. धन्यवाद.

**मा.सभापती :-** विषय क्र.५ आणि विषय क्र.७ याच्यामध्ये ठेकेदाराची मुदत कधीचीच संपुन गेलेली आहे. आपण त्यांना वारंवार कोविडचा विचार करुन कोविडची जी परिस्थिती होती. त्याचा विचार करुन आपण वेळोवेळी त्यांना मुदतवाढ दिलेली आहे. आज कोविडची परिस्थिती आटोक्यात आहे. आज कोविड ज्या प्रमाणात होता त्या प्रमाणात नाही. म्हणुन तरीही आपण त्यांचे काम बंद न करता, नविन टेन्डर प्रक्रिया राबवावी तो पर्यंतच त्यांना मुदतवाढ द्यावी असा निर्णय घेण्यात येत आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय, नगरसचिव साहेब एक मिनीट, सभापती महोदय आपण आता जे सांगितलं,१०० टक्के आम्ही तुमच्या मताशी सहमत आहोत. त्याबद्दल वाद नाही. परंतु आपली जी प्रशासकीय मान्यता ४ कोटीची आहे संदर्भीय विषयामध्ये ५ नंबरच्या, मग ते पैसे आपल्याला प्रशासकीय मान्यता शिवाय मिळालेले आहे. त्या पैश्यांचा आपण काय करायच. अखर्चीत राहतील का ते पैसे आयुक्त साहेब.

**मा.सभापती :-** विषय ४ कोटीचा आहे. ऐका ना, मार्च पासुन आता जुलै महिना ३ महिन्यात १ कोटी चा खर्च झालेले आहे. आता आपल्याला किती महिने घ्यायचे आहे. मार्च २०२२ पर्यंत तरतुद केलेली आहे. मग आजच खर्च करुन टाकायचा का ?

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय,

**मा.सभापती :-** त्याच्यानंतर पुढे तिसरी लाट जर आली तर कुठुन पैसा उपलब्ध करणार.

**श्री.कुलभुषण पाटील :-** मी प्रशासनाला विचारत आहे की, संबंधीत निधी आपण प्रशासकीय मान्यतेने घेतलेला आहे. हा अखर्चीत राहील का मग.

**मा.आयुक्त :-** महापालिकेचा निधी अखर्चीत राहण्याचा प्रश्न येणार नाही. मुद्दा ऐवढाच आहे की, आपण प्रशासकीय मान्यता घेतलेली आहे. त्याच प्रशासकीय मान्यतेच्या रकमेमधुन फक्त आता आपण नव्याने निविदा प्रक्रिया काढुन नविन पुरवठादार आपण निश्चित करणार आहोत. स्वतंत्र खर्च करण्याची गरज नाही. कारण ४ कोटीच्या खर्चाची तरतुद आपण ऑलरेडी आपण केलेली आहे. आता फक्त जुन्या ठेकेदाराला मुदतवाढ न

देता किंवा त्याच्याकडुन वाढीव कालावाधी मध्ये काम न करुन घेता, नविन ठेकेदार आपण याच्यासाठी नविन कर्मचारी पुरविण्यासाठी आपण नेमणार आहोत.प्रशासकीय मान्यतेच्या रकमेला अधिन राहुन आपल्याला नविन निविदा प्रक्रिया करण्यामध्ये तांत्रिक अडचण काही येणार नाही.

**श्री.कुलभुषण पाटील :-** परंतु साहेब मला सांगा, उद्या उठुन याच्यात काही कायदेशीर बाब तयार झाली. आणि संबंधीत ठेकेदार संबंधीत मक्तेदार हा कोर्टात गेला की, मला ४ कोटी रुपयाची प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली होती. परंतु माझे काम १ कोटीची झाल्यानंतर मला संबंधीत विभागाकडुन किंवा प्रशासनाकडुन मला काम थांबविण्याचे सांगितले असतांना माझे याच्यामध्ये आर्थिक नुकसान झालेले आहे. या सर्व गोष्टींसाठी जबाबदार कोण ?

**सहा.आयुक्त, आरोग्य विभाग, श्री.पवन पाटील :-** सन्मा.सभागृह, आपण ही टेन्डर प्रोसेस जी केली होती ना. तेव्हा आपण आवश्यकतेप्रमाणे जेवढे कर्मचारी घेऊ. त्याच कर्मचाऱ्यांचे पेमेंट करणार होतो अश्या पध्दतीने केली होती. ई-टेन्डर प्रोसेस करतांना जुन जुलै २०२० मध्ये केली होती. जेव्हा कोरोना एकदम पिकवर होता. तेव्हा पेशंट खुप मोठया प्रमाणावर वाढत होते. पेशंटची संख्या झपाट्याने वाढत असल्याने सी.सी.सी. सेंटर मोठया प्रमाणावर तयार करावे लागणार होते. काही दिवसात डबल पेशंटाची संख्या होइल या दृष्टीने सफाई साठी कर्मचाऱ्यांची संख्या अपुर्ण पडणार नाही. या दृष्टीने आपण टेन्डर प्रोसेस केली होती आणि त्यामध्ये आपण हा मुद्दा प्रशासनाने घेतला होता की, जेवढे कर्मचारी आवश्यक असतील तेवढेच कर्मचारी आपण घेऊ. त्याप्रमाणेच त्यांना पेमेंट होईल असा आपण घेतला होता.

**श्री.कुलभुषण पाटील :-** नाही नाही पाटील साहेब, ऐका ना, तुम्ही वेगळा विषय सांगता आहे, मी वेगळा विषय सांगतो आहे. ठिक आहे, आपल्या म्हणण्याशी आम्ही सर्व सहमत आहोत. परंतु आमचा म्हणायचा अर्थ इतकाच आहे. आपण संबंधीत ठेकेदाराला काम देतांना त्याला प्रशासकीय मान्यता देत असतांना त्याला आपण ती रकमेमध्ये किंवा त्या लॉट मध्ये ही केलेली आहे की, आपण मजुर संख्यावर निश्चित केलेली आहे. हे सांगा मला फक्त

**सहा.आयुक्त, आरोग्य विभाग, श्री.पवन पाटील :-** नाही आता आपण तेव्हा असा अंदाज केला होता की, आपले कोविड सेंटर खुप मोठया प्रमाणावर वाढतील आणि त्या प्रमाणात आपल्याला कर्मचारी पुरवठा आवश्यक असणार आहे. तो अंदाज करुन.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती साहेब, आयुक्त साहेब, अंदाज हा नेहमी चुकीचा असतो. हवामानाचा अंदाज असतो की, आज पाऊसाचा मान ३० मीमी मध्ये होईल. परंतु त्यादिवशी इतके उन असते की, पाऊसाचा एक थेंब ही पडत नाही. अंदाज हा कधीच बांधता येत नसतो. अंदाज हा कधीही चुकतो.

**मा.सभापती :-** कुलभुषण भाऊ.

**श्री.कुलभुषण पाटील :-** ऐका ना सभापती महोदय, भविष्यामध्ये कुठल्याही पध्दतीची कायदेशीर बाब उपस्थित होऊ नये या दृष्टीने प्रशासनाने या विषयाचा विचार करुन तद्नंतर निर्णय घ्यावा. जो काही निर्णय प्रशासनाला घ्यायचा आहे. फक्त भविष्यात काही कायदेशीर बाब उपस्थित होणार नाही. त्या दृष्टीने निर्णय घेण्यात यावा.

**मा.सभापती :-** कुलभुषण भाऊ, तुमचे काय म्हणणे आहे. ४ कोटी संपेपर्यंत संबंधीत ठेकेदाराला काम द्यायचे का ? अस म्हणायच आहे का तुम्हाला.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सन्मा.सभापती महोदय, म्हणजे माझ्या डोक्यामध्ये एक केव्हाची शंकेची पाल चुक चुक करते आहे.ती म्हणजे अशी की,

**मा.सभापती :-** ऐका ना, यांना जी मुदत दिलेली होती ती मुदत संपलेली आहे. मुदत दिल्यानंतर व संपल्यानंतर ही आपले अधिकार आहेत. आपण त्यांना मुदतवाढ द्यायची की, नविन टेन्डर कॉल करायचे हा आपला अधिकार आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** १०० टक्के मला त्या भागात जायचेच नाही. कायदेशीर प्रक्रियेत माझे म्हणायचा अर्थ फक्त इतकाच आहे. उद्या उठुन यामध्ये जर काही कायदेशीर बाब तयार झाली. तर या सर्व विषयासाठी प्रशासन जबाबदार राहील. याच्याशी सदस्यांचा कुठला काही संबंध येणार नाही. याच्या मध्ये अभ्यासपुर्वक निर्णय घेण्यात यावा. अस मला वाटत.

**सहा.आयुक्त, आरोग्य विभाग, श्री.पवन पाटील :-** स्थायी समिती जो काही निर्णय घेईल. याची अंमलबजावणी प्रशासनाकडुन करण्यात येईल.

**मा.सभापती :-** कुलभुषण भाऊ स्थायी समिती निर्णय घेत आहे. रिकॉल करायचे टेन्डर हे प्रशासन घेत नाही. त्यांना आपण सुचित करत आहात.

**श्री.कुलभुषण पाटील :-** आमच सर्व सदस्यांचे म्हणणे अस आहे की, या सर्व प्रोसेस मध्ये कायदेशीर आपल्याला ते रिकॉल कराव लागेल. किंवा त्याला मुदतवाढ द्यावी लागेल. हे तपासुन आणि मग तद्‌नंतर जे योग्य होईल. तो निर्णय प्रशासनाने घ्यावा. अस आज रोजी सर्व सदस्यांच्या वतीने मी सांगत आहे.

**मा.सभापती :-** निर्णय आपण घेणार आहोत.

**सौ.ज्योती चव्हाण :-** सभापती महोदय,

**मा.सभापती :-** बोला ताई.

**सौ.ज्योती चव्हाण :-** माझ काय म्हणणे आहे, विधीतज्ञांचे मत घ्या ना याच्या मध्ये, ते जर म्हणतील आपल्याला काही कायदेशीर अडचणी येणार नसतील. तरच रिकॉल करा. विचारुन घ्या आणि पुढच्या स्थायी सभेमध्ये ठेवा परत विषय.

**श्री.कुलभुषण पाटील :-** तो पर्यंत तहकुब करा.

**सौ.ज्योती चव्हाण :-** रिकॉल करण्याची अजुन घाई करु नका. विधीतज्ञांचा सल्ला घ्या.

**मा.सभापती :-** याच्याने प्रत्येक वेळी संबंधीत एजन्सीला मुदतवाढ मिळत असते. आपणच विषय हे करतो, आपणच लांबवतो, आणि नंतर मग आपणच पुढच्या सभेत आरोप करतो की, ही मुदत संपली ती मुदत संपली, ऑलरेडी त्याची मुदत संपलेली आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** याच्यामध्ये मुदत संपण्याचा, सभापती महोदय, जसा आता प्रशासनाने आपल्याला सांगितल, आयुक्त साहेबांनी सांगितल की, हा विषय थोडा वेगळा आहे. याच्यामध्ये ऑलरेडी आपण खर्चाला मान्यता सभापती महोदय आपल्या अध्यक्षतेखाली स्थायी समितीने दिलेली आहे. त्याच्यामुळे याच्यात मुदतवाढीने किंवा नविन टेन्डर प्रसिध्द करणे हा जरी प्रशासनाचा भाग असला तरी खर्चाला मान्यता आपण यापुर्वीच दिलेली आहे. त्याच्यामुळे मला अस काही वाटत नाही की, काही खास फरक पडणार आहे. आणि तो संबंधीत जो मक्तेदार आहे. तो तुमचा नातेवाईक आहे की, माझा नातेवाईक आहे. इतर कोणत्या सदस्यांचा नातेवाईक आहे की, कोणाचा मित्र आहे किंवा कोणाचा शुभचिंतक आहे. त्याच्याशी आम्हाला कुठल्याच सदस्याला काही घेणे देणे नाही. फक्त याच्यामध्ये कायदेशीर बाब उभी राहु नये. या अनुषंगाने आपण सर्व गोष्टी निश्चित करुन आमचे मत मांडत आहे.

**मा.सभापती :-** खर्चाची तरतुद करणे हा भाग वेगळा आहे. आणि संबंधीत ठेकेदाराला काम देणे हा भाग वेगळा आहे. तुम्ही त्याची सरमिसळ करु नका.

**श्री.कुलभुषण पाटील :-** बहुतेक मला माझ्या माहिती प्रमाणे, सदरचा मक्तेदार हा मिनीमम वेजेसनुसारच काम करत आहे.

**मा.सभापती :-** ठिक आहे सदरचा विषय आपण तहकुब ठेवु आणि पुढच्या सभेत निर्णय घेऊ.

**सौ.ज्योती चव्हाण :-** संपुर्ण माहिती घेऊन टाका विधीतज्ञांकडुन.

**मा.सभापती :-** विधीतज्ञांचा सल्ला घेऊन पुढच्या सभेत हा निर्णय घेऊ.

**श्री.कुलभुषण पाटील :-** संबंधीत विषयाची प्रशासनाने पुढच्या सभेत अहवालाची सविस्तर माहितीसह डॉकेट सोबत जोडुन मग सादर करावा.

**सौ.ज्योती चव्हाण :-** बरोबर आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** ५ आणि ७ नंबरचा विषय आहे का ?

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.३३९ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, प्रशासनाने आस्थापना सुचिवरील कार्यरत कर्मचाऱ्यांचा आढावा घ्यावा. मनुष्यबळ उपलब्ध असल्यास तात्काळ मनपाचे कर्मचारी अतिक्रमण विभागास उपलब्ध करुन दयावेत. जेणे करुन मनपाचा आस्थापना खर्च कमी होईल.

प्रशासनाकडुन आलेला प्रस्ताव तहकूब करणेत येत असून प्रशासनाने माहितीसह सविस्तर प्रस्ताव पूढील स्थायी समितीच्या सभेत सादर करावा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १६** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- सोनवणे मुकुंदा भागवत**

**नगरसचिव :- विषय क्र. ६ :-** उमाळा जल शुध्दीकरण केंद्र या ठिकाणी पाणी शुध्द व निर्जंतुकीकरण करणेसाठी लागणारे पिवळी तुरटी (ॲलम) पुरवठा करणेस्तव झालेल्या ई-निविदेव्दारे पुरवठादार विक्रम केमिकल्स,नाशिक यांचे वाटाघाटी अंती प्रति मे.टन रु.१५,३६०/- (GST सह) मात्रचे दर स्विकृत करणेस मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा .

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय ,

**मा.सभापती :-** बोला ताई

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय , आज पेपरला आलेले आहे की, आपले सन्मा.सदस्य प्रशांतभाऊ नाईक यांनी पेपरला , सभापतींना एक लेटर दिलेले आहे आणि काल पण ते व्हाटसअप ला सगळी कडे फिरत होत , त्यांच्या म्हणण्यानुसार हा ठराव रद्द करण्यात यावा. याच्यामध्ये काही गोंधळ आहे. तर तो काय गोंधळ आहे, काय आहे तर त्यांनी जर सविस्तर चर्चा केली तर आम्हालापण समजेल की त्याच्या मध्ये काय आहे काय नाही

**मा.सभापती :-** माझ्याकडे काल पत्र आलेले होते आणि मी पत्रही आल ते मी कार्यालयातुन निघुन गेल्यानंतर त्यांनी ते पत्र पाठवलेले आहे.आमच्या पी.ए कडे दिलेल होत आणि परत त्यांनी तासाभरात ते पत्र परत घेवुन गेले आणि त्यांनी सांगीतले की माझ समाधान झालेल आहे.असा मला पी.एंचा फोन आला की भाऊ सन्मा.सदस्य प्रशांतभाऊ नाईक यांनी एक पत्र दिलेल आहे. मी म्हंटल की तुम्ही घेवुन टाका परत तासाभराने फोन आला पी.ए चा की त्यांच समाधान झाल्याच त्यांनी मत व्यक्त केल आणि पत्र परत घेवुन गेलेले आहे.त्यांनी ओ.सी वगैरे घेतलेली नव्हती फक्त देवुन निघुन गेलेले होते. परत पत्र घेवुन गेले. तर आता मला वाटत की प्रशांतभाऊंनी ते क्लियर करावं की नेमक विषय काय होता

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय , मला पण तेच म्हणायच आहे की,

**मा.सभापती :-** त्यांच मत , त्यांनी त्यांच मत नोंदवल पाहीजे सभेमध्ये

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय , म्हणजे आम्हालापण समजायला पाहीजे की पहिले पत्र दिलं जात नंतर मग नंतर तक्रार मागे घेतली जाते.

**मा.सभापती :-** वर्तमानपत्रामध्ये सुध्दा बातम्या आलेल्या आहेत तर त्यांनी त्यांचा खुलासा द्यावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.सभापती महोदय, या संदर्भात वृत्तपत्रात आलेल्या बातमीच्या अनुषंगाने मा.प्रशासन महोदयांशी चर्चा केली आणि त्यामध्ये वृत्तपत्रातील बातमीचा जो आधार होता की सदरहु प्रक्रीयेमध्ये मक्तेदारावरती कुठलातरी दबाव आणल्यानंतर ती निविदा प्रक्रीयेमधुन त्याला माघारी करण्यात आल आहे.परंतू मला वाटत की प्रशासनाला विचारणा केल्यानंतर सदरहु मक्तेदाराने अश्या पध्दतीची कुठलीही लेखी तक्रार महानगरपालिका प्रशासन किंवा संबंधित पदाधिकारी किंवा पोलीस स्टेशनला कुठेही केलेली दिसुन येत नाही . तर मला वाटत की कुठेतरी गैरसमजातुन निर्माण झालेली ती बातमी असावी. असा एक प्राथमिक अंदाज दिसतो आणि या संदर्भात सर्व बाबींमध्ये कायदेशीर पालन झाले आहे किंवा नाही या संदर्भात मा.आयुक्तांनी खुलासा करावा.

**मा.सभापती :-** भाऊ परिक्षेला प्रशांतभाऊ बसले आहे आणि उत्तरपत्रिका तुम्ही सोडवताहेत .

**सौ.उज्वला बेंडाळे :-** नितीनभाऊ प्रशांतभाऊ नाहीये का आज

**मा.सभापती :-** त्यांचा पेपर तुम्ही सोडवताहेत , त्यांना खुलासा देवु द्याना.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** प्रशांतभाऊ कसे काय समाधानी झाले ते आम्हाला ऐकायचे आहे. नितीनभाऊ , आवाज येत नाहीये.

**मा.सभापती :-** भाऊ तुमचा माईक म्युट आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** संपुर्ण निविदा प्रक्रीया राबविण्याचे काम हे प्रशासन करीत असत आणि जर कधी एखाद्या मक्तेदाराला या संदर्भात अश्या पध्दतीने वृत्तपत्रात आलेल्या बातम्यांच्या आधारावरन की सदरहु मक्तेदाराला धमकवण्यात आलेले आहे. परंतू प्रशासनाकडुन माहिती घेतली असता , मक्तेदाराला कुठे धमकवण्याची तक्रार मनपा प्रशासनाकडे किंवा कोणी पदाधिकाऱ्यांकडे किंवा पोलीस स्टेशनला तक्रार दाखल झाल्याचे दिसुन येत नाहीये. तर यामुळे प्रशासनाने जी प्रक्रीया राबविली आहे. ती योग्य पध्दतीने राबविली आहे किंवा कसे याबाबतीत प्रशासनाने योग्य पध्दतीने त्याचा खुलासा सादर करू शकतील.

**नगरसचिव :-** अनुमोदक ?

**मा.सभापती :-** भाऊ त्यांची तक्रार कायम आहे का त्यांनी खुलासा करावा.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** आम्हाला माहिती द्या.

**मा.सभापती :-** भाऊ

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सचिव साहेब आम्हाला संपुर्ण माहिती मिळु द्या त्यानंतर

**मा.सभापती :-** भाऊ सन्मा.सदस्य प्रशांतभाऊ नाईक यांची तक्रार कायम आहे का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही तक्रारदाराने तक्रार केलेली असेल त्याबद्दल दुमत नाहीये , वृत्तपत्रामध्ये बातमी आलेली आहे त्याच्याबद्दल दुमत नाहीये. शेवटी या सगळया निविदा प्रक्रीया राबविण्याची जबाबदारी ही तशी बघितली तर ती संपुर्ण प्रशासनावरती आहे आणि प्रशासनाने जर कधी कायदेशीर बाबींचा अवलंब केला असेल तर निश्चितपणे त्याला मान्य करायला काही हरकत नाही किंवा त्याच्यामध्ये कुठल्या बेकायदेशीर कृतीचा अवलंब झाला असेल, कुणी मक्तेदाराची जर कधी त्याच्यामध्ये तक्रार असेल की मला या निविदा प्रक्रीयेमध्ये दादागिरी करून किंवा कुठलातरी गैरमार्गाचा अवलंब करून मला या प्रक्रीयेपासुन वंचित ठेवले आहे अशी काही तक्रार असेल तर निश्चितपणे प्रशासनाने तश्या तक्रारीची दखल घेवुन त्या पध्दतीने कार्यवाही करावी. त्याबद्दल आमच दुमत नाहीये.

**मा.सभापती :-** त्यांच म्हणण होत की चौथी निविदा आली होती तर त्यांचे काही दोन डॉक्युमेंट नव्हते त्याच्यासाठी त्यांना संधी दिली गेली नाही. तर त्यांच काय निविदे प्रक्रीयेची काय पावती होती आणि काहीतरी ॲग्रीमेंट होत. दोन डॉक्युमेंट नसल्यामुळे त्यांना माघार घ्यायला लावली . असा त्यांचा आरोप होता , मला पत्र दिलेल आहे, मला पत्र व्हॉटसअप ला आलेले आहे. तर मी ते वाचल तर त्याच्यामध्ये तक्रार केली आहे . तर त्याच्यामध्ये तथ्य आहे की काय आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** राजुभाऊ आपण जे म्हणता आहे ना मान्य आहे मला शेवटी तक्रारदार कोण आहे ? तक्रारदार हा ज्या मक्तेदारावर अन्याय झाला असेल आणि तो मक्तेदार जर कधी तक्रार करत असेल की मला कागदपत्र पुरविण्या संदर्भातील जी नैसर्गिक न्याय तत्वावरची संधी जी देण अपेक्षित होत ती मला दिली गेलेली नाहीये आणि त्या अनुषंगाने मला पुनश्च त्यासंदर्भातली संधी उपलब्ध करून देण्यात यावी. अशा पध्दतीची तक्रार जर कधी संबंधीत अन्याय झालेल्या मक्तेदाराने केली असती तर निश्चितपणे आपण त्याची दखल घ्यायला पाहीजे आणि सन्मा.सदस्य. प्रशांत नाईक यांनी दिलेली तक्रार त्या तक्रारीच्या अनुषंगाने जर आपल्याला वाटत असेल की तक्रारी मध्ये कुठेतरी तथ्य असेल आणि कुठेतरी गैरव्यवहार झालेला असेल तरी प्रशासनाने त्या संदर्भातली सुध्दा दक्षता घ्यावी. परंतू त्याच्या साठी मला वाटत की ही प्रक्रीया थांबवणे हे कदापीही योग्य होणार नाही.

**मा.सभापती :-** तक्रार ठेकेदाराने केलेली नाहीये भाऊ , तक्रार आपल्या नगरसेवकांनी केलेली आहे आणि त्यांच्या पत्रासोबत संबंधित ठेकेदाराचे पत्र सुध्दा नाहीये की चला , त्यांनी नगरसेवकांकडे लेखी तक्रार केलेली आहे आणि त्याच्या अनुषंगाने त्यांनी मला पत्र दिलेल आहे. तसा कुठलाही प्रकार नाहीये त्या ठेकेदाराची काहीही तक्रार नसतांना नगरसेवकाने तक्रार केलेली आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अस नाहीये

**मा.सभापती :-** स्थायी समितीचे सन्मा.सदस्य आहेत ते

**सौ.उज्वला बेंडाळे :-** मला पण व्हॉटसॲपला आलेली आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो पत्राच्या बाबतीतील बातमी वृत्तपत्रातुन वाचली. त्याबद्दल दुमत नाहीये. परंतू मी म्हंटल ना की ही संपुर्ण प्रक्रीया कायदेशीर आहे की बेकायदेशीर आहे आणि ती संपुर्ण प्रक्रीया राबविण्याचे काम प्रशासन करीत असते आणि प्रशासन या सर्व चौकशी अंतीचा अहवाल हा डॉकेट जो आहे. तो स्थायी समिती समोर पाठवत असते.

**मा.सभापती :-** आता त्यांची तक्रार राहीलेली नाही असे समजायचे ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही त्यांची तक्रार आहे किंवा नाही त्याच्याबद्दल मी बोलु शकणार नाही किंवा आपणही बोलु शकणार नाही. ज्याची तक्रार आहे त्याच्याबाबतीत त्या तक्रारीची दखल घेतली गेली असेल किंवा नाही घेतली गेली असेल तो भाग त्याच्या संदर्भातील असेल.

**सौ.उज्वला बेंडाळे:-** ते ऑनलाईन नाहीत.

**मा.सभापती :-** संबंधित सदस्य आता ऑनलाईन दिसुन नाहीयेत. मग ते ऑनलाईन येत नाहीत तोपर्यंत थांबवायचा का हा विषय ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही विषय थांबवण्यामध्ये तशी काही अडचण नाहीये ना, उद्या सदस्य असतील किंवा नसतील. परंतू उपस्थित सदस्यापैकी प्रक्रीया राबविली जात असते आणि तक्रारदाराला तक्रार करायची असले तर तक्रारदारचे हक्क आपण हिरावुन घेत नाहीये.
**मा.सभापती :-** उद्या त्यांनी बोलायला नको की मला बोलायची संधी मिळाली नाही म्हणुन
**श्री.नितीन लढ्ढा :-** अहो पण ती त्या सदस्याची जबाबदारी आहे ना, आता जसे मक्तेदार तक्रार करीत नाहीये. परंतू आपण असे गृहीत धरतोय की मक्तेदाराची अशी तक्रार होती. परंतू मला वाटते की तक्रारदाराची तक्रार नव्हती तिथे कारण तक्रार करणारी व्यक्ती जी असते.
**मा.सभापती :-** कारण त्यांना संधी द्यायला पाहीजे आपण
**श्री.नितीन लढ्ढा :-** निश्चितच त्यांनी त्यांची संधी मा.आयुक्तांकडे मांडु शकतात , वृत्तपत्रांच्या माध्यमातुन मांडु शकतात. ते स्वायतत्य आहेत. परंतू त्यांच्या तक्रारीचे निरसन झाले असावे. कदाचित त्यांनी दिलेली तक्रार ही गैरसमजुतीतुन झाली असावी किंवा त्यांना आता त्या तक्रारीच्या संदर्भात तक्रार राहीलेली नसावी.
**श्री. मुकुंदा सोनवणे :-** राजुभाऊ सेटींग झाली असेल जावु द्या विषय
**मा.सभापती :-** नितीनभाऊ एकंदरीत आपल्या बोलण्यावरून असे वाटते की त्यांच समाधान झालेले आहे.
**श्री. मुकुंदा सोनवणे :-** समाधान झालेले आहे त्यांचे
**मा.सभापती :-** ठिक आहे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** मंजुर करण्यात यावा.
**मा.सभापती :-** सर्वानुमते मंजुर का ? ताई
**सौ.उज्वला बेंडाळे:-** विरोध आहे आमचा , माझा विरोध आहे.
**श्री. मुकुंदा सोनवणे :-** याला माझा पण विरोध आहे.
**मा.सभापती :-** मुकुंदाभाऊ आणि उज्वलाताई यांचा विरोध आहे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** ज्यांचा विरोध असेल त्यांचा विरोध नोंदवुन विषय पारीत करण्यात यावा.
**श्री.अमित काळे :-** माझा पण विरोध आहे.
**मा.सभापती :-** मुकुंदाभाऊ , उज्वलाताई आपण
**सौ.उज्वला बेंडाळे:-** भाऊ माझा विरोध आहे.
**नगरसचिव :-** उज्वलाताई आपला विरोध आहे आणखी विरोध कोणाचा आहे.
**श्री.अमित काळे :-** माझा पण विरोध आहे.
**श्री. मुकुंदा सोनवणे :-** याला माझा पण विरोध आहे.
**नगरसचिव :-** मुकुंदाभाऊ यांचा विरोध आहे आणखी
**श्री.अमित काळे :-** अमित काळे
**नगरसचिव :-** अमितभाऊ , म्हणजे सन्मा.सदस्य .अमितभाऊ काळे , मुकुंदाभाऊ सोनवणे आणि उज्वलाताई बेंडाळे या तिघं सदस्यांचा विरोध आहे. बाकी हा ठराव बहुमताने मंजुर करण्यात आलेला आहे.
**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे पुढचा विषय घ्या.
**मा.सभापती :-** ताई , उज्वलाताई
**सौ.उज्वला बेंडाळे:-** हो बोलाभाऊ
**मा.सभापती :-** ठराव नामंजुर करण्यात यावा असे म्हणणे आहे का तुमचे ?
**सौ.उज्वला बेंडाळे:-** भाऊ विरोध आहे माझा जोपर्यंत पुर्ण माहिती मिळत नाही. एकीकडे संभ्रमामध्ये ठेवायचं आणि एकीकडे तक्रार मागे घ्यायची आणि एकीकडे पुर्ण डिटेल माहिती मिळालेली नाहीये. त्यामुळे त्याला विरोध आहे माझा त्याला
**श्री. मुकुंदा सोनवणे :-** प्रशांतभाऊंचा आवाज येतोय एका साईडला, प्रशांतभाऊंचा आवाज येतोय
**श्री.नितीन लढ्ढा :-** चला घ्या पुढचा विषय घ्या.
**मा.सभापती :-** सदरच्या विषयाला तिन सदस्यांचा विरोध आहे बाकी कीती आहेत.
**नगरसचिव :-** तिन सोडुन बाकी
**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे ना बहुमताने घ्याना उर्वरीत
**मा.सभापती :-** उर्वरीत सदस्यांचा सदरच्या ठरावाला पाठींबा आहे म्हणुन सदरचा विषय मंजुर करण्यात यावा.
**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे ना.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ३४० पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव मधील उमाळा जल शुध्दीकरण केंद्र या ठिकाणी पाणी शुध्द व निर्जतुकीकरण करणेसाठी लागणारे पिवळी तुरटी (ॲलम) पुरवठा करणेसाठी निविदा भरणे करीता दिलेल्या मुदतीत ०४ ई-निविदा प्राप्त झालेल्या असुन त्यापैकी आयुक्त व निविदा समिती यांच्या दि.०२/०६/२०२१ च्या मान्यतेने पात्र झालेले ०३ निविदाधारकांचे दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| निविदा धारकाचे नांव | अलमायटी केमिकल्स, नाशिक | विक्रम केमिकल्स, नाशिक | ठक्कर इनिआर्गॅनिक्स प्रा.लि.मुंबई |
|---|---|---|---|
| निविदा रक्कम प्रति मे.टन | १७,२००/- | १५,९९९/- | १९,०००/- |

उपरोक्त पात्र ०३ निविदाधारकांपैकी पुरवठादार विक्रम केमिकल्स, नाशिक (L१) यांचे दर सर्वात कमीचे रक्कम रु.१५,९९९/- प्रति मे.टन आलेले असून सदर आलेले दर हे जास्तीचे वाटत असल्याने पुरवठादार विक्रम केमिकल्स, नाशिक यांचे वाटाघाटी अंती आलेले प्रती मे.टन रक्कम रु.१५,३६०/- (GST सह) मात्रचे दर स्विकृत करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे प्रकरण ७३(क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**बहुमताने मंजुर**

**अनुकुल मते :- ११ प्रतिकुल मते :- ०३**

**सुचक :- लढ्ढा नितीन बालमुकूंद**

**अनुमोदक :- दारकुंडे नवनाथ विश्वनाथ**

**नगरसचिव :- विषय क्र. ७:-** जळगांव महानगरपालिका अंतर्गत म.न.पा.चे विविध ठिकाणचे कोविड-१९ साठीचे सी.सी.सी. व क्वॉरटाईन सेंटर येथील शौचालय, मुताऱ्या, रुम पॅसेज, परिसर स्वच्छ करणे व या ठिकाणी औषधी फवारणी करणे कामी दैनंदिन ४५० (आवश्यकतेप्रमाणे) कामगारांचा पुरवठा करणे कामी मे.दिपक उत्तराधी, अमरावती यांना मंजूर रकमेपर्यंत किंवा पून्हा ६ महिन्यापर्यंत मंजूर दरात मुदतवाढ देणे बाबत व मक्तेदाराने सदर कामासाठी दैनंदिन प्रत्यक्ष पुरविलेले कामगारांचे येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणे बाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** झाले ना ५ आणि ७ सारखे होते ना , पुढचा घ्या, ५ आणि ७ सारखे आहेत ना

**मा.सभापती :-** विषय क्रं. ५ मध्ये आपण जो निर्णय घेतलेला आहे तो तोच निर्णय विषय क्रं. ७ साठी घेण्यात यावा.

**नगरसचिव :-** ७ नंबरचा तहकुब आहे ना भाऊ तहकुब ठेवण्यात यावा.

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो हो तहकुब ठेवावा . हो ५ आणि ७ तहकुब आहे ८ वा घेण्यात यावा.विषय क्रं. ८ घ्या.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.३४१ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, सदरचा प्रस्ताव तहकूब करणेत येत असून प्रशासनाने संपूर्ण माहितीसह प्रस्ताव पूढील स्थायी समितीच्या सभेत सादर करावा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- पाटील कुलभुषण विरभान**

**अनुमोदक :- सोनवणे मुकुंदा भागवत**

**नगरसचिव :- विषय क्र. ८:-** महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.१२ मधील अनुराग स्टेट बॅंक कॉलनी मधील १२ मी. रुंद डी.पी.रोड व शिव

रोड क्रॉक्रीटचा करणे कामी मक्तेदार सुरजराजे विजय नारखेडे, जळगांव यांचे निविदा रक्कमेपेक्षा ७.६९% सर्वात कमीचे दरास मान्यता मिळणेस तसेच सदर कामी येणारा एकूण रक्कम रु.९१,८७,८६७/- मात्र चे खर्चास मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**श्री.नितीन बरडे :-** माझे अनुमोदन आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** आता विषय क्रं. ९

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.३४२ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन योजने अंतर्गत जळगांव शहर महानगरपालिका हद्दीत प्रभाग क्रं.१२ मधील अनुराग स्टेट बँक कॉलनी मधील १२ मी. रुंद डी.पी. रोड व शिव रोड क्रॉक्रीटचा करणे कामास जिल्हाधिकारी जळगांव यांचे कडील पत्र क्रं.नप/ नियोजन/ आर.आर./ २८०/२०२० दि.०३/०२/२०२१ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली आहे. सदर कामी निविदा भरणेकरीता दिलेल्या मुदतीत ०५ मक्तेदारांचे ई-निविदा प्राप्त झालेल्या आहे. त्यानूसार सदर कामाचे आलेल्या ई-निविदांचे संगणकावर कागदपत्रांचे फोल्डर क्रं.१ उघडले असता ०५ मक्तेदारांचे उक्त कामाचे प्राप्त झालेले ई-निविदांचे कागदपत्रांचे छाननी केली असता त्यातील मक्तेदार जितेश गणेश ठाकरे यांनी त्यांचे काळया यादीत नसल्याबाबत (Annexure-A) प्रतिज्ञापत्रक नोटरी (विधीवत) करुन सादर केलेले नाही. त्यामुळे त्यांची ई-निविदा निविदा समितीने अपात्र ठरवलेली असल्याने त्यांचे फोल्डर क्रं.०२ उघडण्यात आलेले नाही. तसेच खाली नमुद मक्तेदार यांनी सर्व आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता केलेली असल्याने त्यांचे ई-निविदा फोल्डर नं.२ उघडण्यास निविदा समितीने मान्यता दिल्यानुसार दि.०८/०६/२०२१ रोजी फोल्डर नं.२ ओपन करुन उक्त मक्तेदार यांनी दिलेल्या ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्त्याची संगणकावर प्रिंन्ट प्रत काढुन घेण्यात आली असुन उक्त ई-निविदा दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| अ.क्रं. | निविदा धारकाचे नांव | निविदा रक्कम रु.८६,४८,७०९/- | अपेक्षीत खर्च |
|---|---|---|---|
| १ | मे यश बिल्डर्स & कंन्स्ट्रक्शन कंपनी प्रोपा. कैलास पंडीतराव भोळे | निविदा रक्कमेपेक्षा ६.६०% कमीचे दराने | ८०,७७,८९४/- |
| २ | राजकिरण नरेंद्र चौधरी | निविदा रक्कमेवर २% जास्तीचे दराने | ८८,२१,६८३/- |
| ३ | श्री.गजानन एंन्टरप्राईजेस प्रोपा.भाग्येश हरि ढाकणे | निविदा रक्कमेइतकेचेच दर | ८६,४८,७०९/- |
| ४ | सुरजराजे विजय नारखेडे | निविदा रक्कमेपेक्षा ७.६९% कमीचे दराने | ७९,८३,६२३/- |

वरील तुलनात्मक तक्ता पाहता मक्तेदार सुरजराजे विजय नारखेडे यांचे दर इतर मक्तेदारापेक्षा कामाचे निविदा रक्कमेपेक्षा ७.६९% कमीचे दर सर्वात कमी आलेले आहे. त्यानुसार सदर कामी रक्कम रु.७९,८३,६२३/- मात्र इतका खर्च निविदा रक्कमेप्रमाणे आहे. परंतु निविदेत नमुद प्रमाणे आलेल्या दरानुसार जि.एस.टी.,कामगार विमा, टेस्टींग चार्जेस, व रॉयल्टी यांच्या रक्कमा खालील प्रमाणे समाविष्ठ करावयाच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | निविदा प्रमाणे अपेक्षीत खर्च रक्कम | ७९,८३,६२३/- |
| २ | जि.एस.टी.१२% | ९,५८,०३५/- |
| ३ | कामगार विमा ०.५% | ३९,९१८/- |
| ४ | टेस्टींग चार्जेस | ७,२००/- |
| ५ | रॉयल्टी | १,९९,०९१/- |
| | एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु. :- | ९१,८७,८६७/- |

वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत खर्च रक्कम रु.९१,८७,८६७/- मात्र आहे. परंतु मक्तेदार श्री.सुरजराजे विजय नारखेडे यांचे निविदा रक्कमेपेक्षा ७.६९% कमीचे दर सर्वात कमी आलेले असुन निविदा अटी शर्ती नुसार १ ते १० टक्के कमीचे दरा पर्यंत १ टक्का व त्यावरील ११ ते १५ टक्का पर्यंतच्या कमीचे दरास प्रति टक्याला १ टक्का याप्रमाणे परफार्मन्स सिक्युरिटी डि.डी. सादर करणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने मक्तेदार सुरजराजे विजय नारखेडे यांनी निविदा

रक्कमेपेक्षा ७.६९% कमीचे दर सादर केलेले असल्याने त्यांच्या कडुन १% परफार्मन्स सिक्युरिटी म्हणुन अनामत रक्कम रु.९१,८७९/- मात्रचा डि.डी. मनपा खजीन्यात सादर करण्या करीता मक्तेदार यांना पत्र क्रं.साबा/२३८ दि.१०/०६/२०२१ रोजी डि.डी. सादर करण्यासाठी कळविले असता मक्तेदार यांनी मुदतीत मनपा पावती क्रं.६४१३४ दि.१५/०६/२०२१ रोजी रक्कम रु.९१,८७९/- मात्रचा डि.डी. क्रं.२४७०२५ जमा केलेला आहे. त्यानुसार सदर कामी वर नमुद प्रमाणे निविदेत आलेले दरानुसार व सर्व शासकीय कर समाविष्ठ करुन एकुण अपेक्षीत रक्कम रु.९१,८७,८६७/- मात्रचे खर्चास मान्यता प्रदान करण्यात येत आहे. सदर रक्कमेपैकी रक्कम रु.६४,३१,५०७/- मात्र महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियांन योजने अंतर्गतच्या निधीतुन व उर्वरीत रक्कम रु.२७,५६,३६०/- मात्र मनपा निधीतुन सन २०२१-२२ चे लेखा शिर्ष महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान मनपा हिस्सा या लेखाशिर्षातुन करणेस तसेच मक्तेदार सुरजराजे विजय नारखेडे यांचे निविदा रक्कमेपेक्षा ७.६९% कमीचे दर स्विकृत करणेस महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम प्रकरण ७ कलम ७३ (क) नुसार मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४** **प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- बेंडाळे उज्वला मोहन**

**अनुमोदक :- लढ्ढा नितीन बालमुकूंद**

**नगरसचिव :- विषय क्र. ९:-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०५ (१) व १०६(१) अ अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.१३/०१/२०२० ते दि.३१/०७/२०२० (एकूण - २९ अहवाल) अखेर संपणाऱ्या साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा मुख्य लेखापरिक्षक विभागाकडील अहवालाची माहिती घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अहवालाची माहिती घेण्यात आलेली आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय,

**श्री.नितीन बरडे :-** माझे अनुमोदन आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय,

**मा.सभापती :-** बोला ताई

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय, मी काय म्हणत होते , हे जे अहवाल दिलेले आहेत की ३०/०३/२०२० ते ०३/०४/२०२० , आवाज ऐकू येतोय का ?

**मा.सभापती :-** येतोय , येतोय बोला ताई

**सौ.उज्वला बेंडाळे :-** त्यामध्ये शौचालय साफसफाई हॅलो

**मा.सभापती :-** पेज क्रं. सांगा ताई ९ / किती

**सौ.उज्वला बेंडाळे :-** ९ / १२

**मा.सभापती :-** हो बोला

**सौ.उज्वला बेंडाळे :-** त्यावर आहे शौचालय सफाई

**मा.सभापती :-** हो

**सौ.उज्वला बेंडाळे :-** त्याच्यावर जो खर्च दाखविलेला आहे तर शौचालयाची बरोबर साफसफाई होते आहे का? आमच्या भागामध्ये समता नगर आहे. इकडे म्युनिसिपल कॉलनीच्या सार्वजनिक शौचालय आहेत. अतिशय घाणेरड्या स्थितीमध्ये असतात त्या मग हा खर्च कुठे केला जातोय ? याचे मला डिटेल्स पाहीजे.

**मा.सभापती :-** पाटील साहेब

**श्री.पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** सन्मा.सभागृह हा जो शौचालय साफसफाईचा जो खर्च दाखविण्यात आला आहे.तो जळगांव शहरातील जे सार्वजनिक शौचालय आहेत. अंदाजे ते २ हजार शिट जे असतात त्याचा नवल वेल्फेअर यांना मक्ता देण्यात आलेला होता. ते प्रति शिट १९१/- रूपये प्रति महिना याप्रमाणे ते साफसफाई करत होते. त्याकरीता हा शौचालय साफसफाईचा खर्च दाखविण्यात आला आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** पण तो खरोखर होतो का ?

**श्री.पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** जिथे जिथे साफसफाई करण्यात येत नव्हती तिथे तिथे आपल्या करारनाम्यानुसार दंडात्मक कारवाई करण्यात येत होती. त्यानुसार त्या दंडात्मक कारवाईचा दंड वजा करून मक्तेदाराला अदायगी करण्यात येत होती.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** मला माझ्या प्रभागाच या काळामध्ये जेवढे दंड झालेले आहेत त्याचे डिटेल्स मला देण्यात यावे.

**श्री.पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** हो देण्यात येतील.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** दुसरा विषय आहे. सभापती महोदय , दुसरा एक विषय आहे

**मा.सभापती :-** बोला ताई

**सौ.उज्वला बेंडाळे :-** २४/०४/२०२० ते २५/०४/२०२० अग्रीम काय आहे हे , म्हणजे अग्रीम झालेला जो खर्च आहे तो कोणता खर्च आहे.

**मा.सभापती :-** पेज नंबर ९/१४ म्हणताहेत का तुम्ही

**सौ.उज्वला बेंडाळे :-** नाही ९/१५

**मा.सभापती :-** पेज नंबर ९/१४ ला पण आहे अग्रीम

**सौ.उज्वला बेंडाळे :-** काय आहे हे अग्रीम म्हणजे हो १४ ला पण आहे ते

**श्री.संतोष वाहुळे मु.ले.प :-** मा.सभापती,मा.सभागृह आपल्याकडे कर्मचाऱ्यांना वैद्यकीय कारणास्तव अग्रीम आपण देतो तो आपण कर्मचाऱ्यांना वैद्यकीय अग्रीम त्या कालावधी मध्ये आपण पुरविलेले आहे. वैद्यकीय अग्रीम आहेत.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** म्हणजे अग्रीमचा शब्द काय आहे त्याचा अर्थ , स्पेसिफीक शब्द काय आहे तो ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** अग्रीम रक्कमा ज्या आहेत ना ताई , त्या रक्कम दिल्या जातात आणि त्याच्यातुन जो खर्च भागवला जातो तर तो अग्रीम रक्कम म्हणुन म्हंटला जातो त्याला ज्याला आपण ॲडव्हांस म्हणु .

**सौ.उज्वला बेंडाळे :-** हा खर्च कोविड मध्ये केला होता का तो ?

**श्री.कपिल पवार, मुख्यलेखाधिकारी :-** ताई आपण आपण विभाग प्रमुखांना म्हणजे आरोग्य विभाग असेल किंवा वाहन व्यवस्था विभाग असेल यांना काही आगाऊ खर्च करण्यासाठी आपण पैसे देतो . त्यात आपण विभाग प्रमुखांना ५० हजार असा ॲडव्हान्स देतो की तातडीच्या कामासाठी त्यांना खर्च करता आला पाहीजे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** हो

**श्री.कपिल पवार, मुख्यलेखाधिकारी :-** त्या नंतर ते बिलाचे समायोजन करीत असतात.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** बर मग आता हा जो केलेला आहे २०/०४/२०२० ते २५/०४/२०२० तर हा कुठला खर्च केलेला आहे. जसा आता ११/०५/२०२० ला जसा कोविड साठी दिलेला आहे. तसा हा फक्त अग्रीम दिलेला आहे तर हा कुठला खर्च केलेला आहे.

**श्री.कपिल पवार, मुख्यलेखाधिकारी :-** हा जो ५० हजार अग्रीम जो दिलेला आहे. हा मुख्यत: वाहन विभाग व्यवस्थेला दिलेला आहे.त्यांच्या ज्या वाहनांच्या दुरूस्ती वगैरे असतात. त्याच्यासाठी आपण त्यांना ५० हजार रूपये ॲडव्हान्स देतो आणि त्या तातडीच्या दुरूस्त्या ते करून घेतात आणि मग त्यानंतर ते त्या अग्रीमाचे समायोजन करतात.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** बर ठिक आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** सभापती महोदय,

**मा.सभापती :-** हो बोला ताई

**सौ.ज्योती चव्हाण :-** सभापती महोदय, तसेच या लेखा परिक्षणाबद्दल मला एक विचारायचे आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** एक मिनिट ज्योतीताई मला बोलायचे आहे थोडे राहीले आहे अजुन

**सौ.ज्योती चव्हाण :-** हो

**मा.सभापती :-** बोला उज्वलाताई

**सौ.उज्वला बेंडाळे :-** याच्यामध्ये असं दिलेले आहे की २०/०७/२०२० ते २४/०७/२०२० पेज नंबर आहे ९/२८

**मा.सभापती :-** बोला ताई

**सौ.उज्वला बेंडाळे :-** कुत्रे निर्बिजिकरण देयक जे कुत्र्यांच निर्बिजीकरण केले गेले, आपल्या इथे काय केले गेल आहे नाही केल गेलेल आहे हे त्यांनाच माहिती कारण की संख्या वाढते आहे, मागच्या वेळेला त्यांनी त्या

संदर्भात निवेदन पण द्यायला येवुन गेले आहेत. याच्यामध्ये हा जो खर्च झालेला आहे. हा किती याच्यावर झालेला आहे. खरच झालेला आहे का कुठल्या प्रभागांमध्ये केला आहे.सभापती महोदय,

**श्री.कपिल पवार, मुख्यलेखाधिकारी :-** ताई हा कुत्रे निर्बिजिकरणाचे जे देयक आहे ते आपण मागे कुत्रे निर्बिकरणासाठी संपुर्ण शहरासाठी लक्ष्मी  इंन्स्टिट्युट या संस्थेची नियुक्ती आपण केलेली होती. त्या संस्थेचे आपण मागील काळातले हे देयक आहे . १०२९३५०/- रूपयांचे

**सौ.उज्वला बेंडाळे :-** पण त्यांनी काम पुर्ण केलय का ते , कुठल्या प्रभागात केले आहे

**श्री.कपिल पवार, मुख्यलेखाधिकारी :-** ताई हे प्रभाग वाईज नाहीये ते पुर्ण शहराचे देयक आहे आणि त्यात प्रभागवाईज नसते की शहरामध्ये त्यांनी कुठे कुठे निर्बिजिकरण केलय.त्यांची एकत्रित लिस्ट असते आणि त्याप्रमाणे पुर्ण शहराचे देयक आहे ते

**मा.सभापती :-** ताई आपल्याला काही माहिती

**सौ.उज्वला बेंडाळे :-** पण शहरामध्ये काम झाल आहे की नाही झालय

**मा.सभापती :-** ताई आपल्याला काही माहिती घ्यायची असल्यास आपण संबंधित विभागाकडुन ती माहिती घेवु शकतात.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर आहे योग्य आहे, योग्य आहे.

**मा.सभापती :-** आपल्याला ती माहिती मिळुन जाईल.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर आहे योग्य आहे, योग्य आहे.

**मा.सभापती :-** आणि आता विषय निघाला आहे म्हणुन आता नविन काम देण्याच्या दुसऱ्या एजन्सीचा काय विषय आहे. ती शहराची जी मागणी आहे. निर्बिजीकरणा विषयी

**श्री.पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** सन्मा.सभागृह , आपण नविन टेंडर प्रोसेस करण्यात आलेली होती . तेव्हा चार निविदा प्राप्त झालेल्या होत्या. त्यापैकी एक अपात्र करून तिन निविदा तांत्रिक समितीने पडताळणी केली असता. त्या मान्य झाल्या आणि त्यापैकी एल-१ ज्या आलेल्या आहेत. एक नंदुरबारची संस्था आहे. नवयुवक बहुउद्देशिय संस्था या नंदुरबारच्या संस्थेचा ९३८/- रूपये प्रति श्वान या प्रमाणे दर प्राप्त झालेले असुन येणाऱ्या पुढच्या स्थायी समिती सभेमध्ये दर मंजुरीसाठी प्रस्ताव सादर करण्यात येणार आहे.

**मा.सभापती :-** ठिक आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** सभापती महोदय  , सभापती महोदय

**मा.सभापती :-** हो ताई बोला

**सौ.ज्योती चव्हाण :-** लेखा परिक्षण मध्ये तुरटी खरेदी हा जो ॲटम आहे हा पण तिन ठिकाणी दिसतोय. तुरटीची तर आपण आता निविदा काढल्या आहेत ना मग आता तुरटी कशासाठी लागतेय परत तिन ते चार ठिकाणी आहे लेखापरिक्षणामध्ये ९/९ , ९/१८ , ९/३३

**सौ.उज्वला बेंडाळे :-** ९/२६

**सौ.ज्योती चव्हाण :-** हो या तिघे ठिकाणी तुरटी परत का येते आहे ती त्याचा काय कुठे वापर होतो

**श्री.कपिल पवार, मुख्यलेखाधिकारी :-** ताई

**सौ.ज्योती चव्हाण :-** तुरटीची तर आपण निविदा काढतो, दर वर्षी पुर्ण असते मग ही तुरटीची रक्कम पण मोठी आहे ना कुठे लागते आपल्याला

**श्री.संतोष वाहुळे मु.ले.प :-** आपण साधारणपणे एखाद्या आठवड्याचा लेखापरिक्षण अहवाल जेव्हा तयार करतो. तेव्हा त्या आठवड्यामध्ये आलेली आरंभीची शिल्लक त्या आरंभीच्या शिल्लकीमध्ये जमा होणारी जी रक्कम आहे. ती आपण रिसीट मध्ये घेतो, रिसीट ही आपल्या डाव्या बाजुकडे नोंदविलेली आहे.त्याची एकूण आपण जमे खाली ती रक्कम दाखविलेली असते.

**सौ.ज्योती चव्हाण :-** बरोबर

**श्री.संतोष वाहुळे मु.ले.प :-** आणि त्या कालावधी मध्ये त्या आठवड्याच्या कालावधीमध्ये आपण वेगवेगळया बाबींवर जो खर्च केलेला आहे.तो आपल्या उजव्या बाजुला नोंदविलेला असतो. शिल्लक एकूण जमा आणि एकूण खर्च याच्यामध्ये आपली जी एकूण शिल्लक राहते. ती आपली आरंभीची शिल्लक म्हणुन आपण पुढच्या आठवडयामध्ये घेतो. त्यामुळे हा आलेला खर्च आहे खर्चाच्या तपशिलामध्ये जो आपण त्या कालावधीमध्ये खर्च केलेला आहे. त्या बाब निहाय आम्ही व्हाऊचरशी एन्ट्री तपासतो लेखा विभागात जावुन आणि तो व्हाऊचर आणि यांच्या देण्याची पडताळणी केल्यानंतरच आम्ही हा रिपोर्ट येथे सादर करतो

**सौ.ज्योती चव्हाण :-** सगळ बरोबर आहे साहेब पण मग ही तुरटी खरेदीचा आपण एक वर्षाचा ठेका दिला आहे की नाही पण मग आपण परत वेगळे पैसे देवुन कुठे घेतोय हे म्हणायचे आहे मला

**श्री.संतोष वाहुळे मु.ले.प :-** सन्मा.महोदया हा जो खर्चाचा तपशिल आहे त्या कालावधी मध्ये पुरवठा केलेला असेल त्या पुरवठ्याच देयक आपण अदा केलेले आहे.त्या अदा केलेल्या देयकाचा तपशिल आहे तो

**सौ.ज्योती चव्हाण :-** बर

**श्री.नितीन लढ्ढा :-** अकाऊंटींग सिस्टिमचा भाग आहे ताई तो

**सौ.ज्योती चव्हाण :-** त्या त्या महिन्यात त्यांना ते बिल दिलेले आहेत म्हणजे

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो बरोबर आहे.

**श्री.संतोष वाहुळे मु.ले.प :-** हो ती अदायगी झालेली आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अकाऊंटींग सिस्टिमचा पार्ट आहे.

**सौ.ज्योती चव्हाण :-** हो आणि माझ अजुन एक असे म्हणणे आहे की लेखापरिक्षण आज तुम्ही किती महिन्यांनी दिले आहे. हे लेखापरिक्षण प्रत्येक सदस्यांना घरी नाही दिले चालेल किमान स्थायी मध्ये तरी दिले गेले पाहीजे.तरच आम्हाला कळेल की स्थायी मधुन काय खर्च होतोय. जळगांव शहराचा विकास होतोय कोणते कोणते काम होताहेत त्याच्यावर किती खर्च होतोय . हे आम्हाला कळण्यासाठी प्रत्येक वेळेस दिले गेले पाहीजे. ही माझी विनंती आहे प्रशासनाला.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई ते प्रत्येक वेळेलाच दिले जात असत. साप्ताहिक लेखा परिक्षणाचा अहवाल हा दर आठवडयाला मिटींगला देण अपेक्षित असते. परंतू कालांतराने काही कारणास्तव मिटींगा होत नसल्या कारणाने एकत्रित रित्या अशा पध्दतीचे प्रस्ताव या सभेसमोर आलेले आहेत.

**श्री.संतोष वाहुळे मु.ले.प :-** धन्यवाद

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र. ३४३ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम १०५ (१) व १०६(१) अ अन्वये लेखा परिक्षण विभागातील दि.१३/०१/२०२० ते दि.३१/०७/२०२० (एकूण - २९ अहवाल) अखेर संपणाऱ्या साप्ताहिक लेखा तपासणी कामाचा मुख्य लेखापरिक्षक विभागाकडील अहवालाची माहिती घेतली.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- बेंडाळे उज्वला मोहन**

**अनुमोदक :- चव्हाण ज्योती बाळासाहेब**

**नगरसचिव :- विषय क्र. १० :-** महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेणे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** १ ते १२ संविदांची माहिती घेण्यात आलेली आहे.

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.३४४ पारित करण्यात आला.**

असा ठराव करणेत येत आहे की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ७३(ड) नुसार मा.आयुक्त यांनी केलेल्या संविदांची माहिती घेतली.

१.प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./०६ दि.२०/०४/२०२१ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१५ मधील महादेव मंदिर जवळील नाल्यावर पुल बांधकाम करणे कामी मक्तेदार श्री.निखील कृष्णराज पाटील यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.५०% कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१४,८३,४१०/- मात्र खर्चाची संविदा.

२.प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./०७ दि.२०/०४/२०२१ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१५ मध्ये संत गुलाब कॉलनी मधील मागिल रस्त्यावर स्लॅब कल्व्हॅट बांधणे कामी मक्तेदार श्री.रामेश्वर बंन्सीलाल धामणे यांचे निविदा रक्कमेपेक्षा ०.५०% कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.९,५४,००४/- मात्र खर्चाची संविदा.

३.प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./०९ दि.२२/०४/२०२१ अन्वये नागरी दलितेत्तर वस्ती सुधारणा योजने अंतर्गत प्रभाग क्रं.१२ जय नगर ते ओंकारेश्वर मंदिर परिसर येथे आर.सी.सी.गटार व स्लॅब कल्व्हेट बांधणे कामी मक्तेदार श्री.निखील कृष्णराज पाटील यांचे निविदा रक्कमेइतकेचेच कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.२४,९५,७४३/- मात्र खर्चाची संविदा.

४.प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./३० दि.३०/०४/२०२१ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्र.१९ मधील सर्व्हे क्र.२७३ एम.डी.एस.कॉलनी परीसरातील खुल्या जागेस वॉल कंपाऊंड व पेव्हींग ब्लॉक बसविणे कामी मक्तेदार श्री.चेतनकुमार नगिनचंद चौधरी यांचे निविदा रक्कमेपेक्षा १% कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.२४,५८,६९८/- मात्र खर्चाची संविदा.

५.प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./३१ दि.३०/०४/२०२१ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्र.१९ मध्ये सर्व्हे क्र.२७३ मधील नाल्याला क्रॉकीट बांधकाम करणे कामी मक्तेदार श्री.चेतनकुमार नगिनचंद चौधरी यांचे निविदा रक्कमेपेक्षा १% कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.२४,१२,१७९/- मात्र खर्चाची संविदा.

६.प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./३२ दि.३०/०४/२०२१ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्र.१९ मधील सदाशिव नगर मध्ये ओपनस्पेस मध्ये कंपाऊंड व पेव्हर ब्लॉकचे कामे करणे कामी मक्तेदार श्री.चेतनकुमार नगिनचंद चौधरी यांचे निविदा रक्कमेपेक्षा १% कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१४,८३,५९४/- मात्र खर्चाची संविदा.

७.प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./३३ दि.३०/०४/२०२१ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्र.१९ मधील उपासने नगर २२/३ मधील ओपन स्पेसमध्ये खुल्या जागेस कंपाऊंड वॉल करणे कामी मक्तेदार श्री.चेतनकुमार नगिनचंद चौधरी यांचे निविदा रक्कमेपेक्षा १% कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१९,१८,५३४/- मात्र खर्चाची संविदा.

८. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./३९ दि.११/०५/२०२१ अन्वये आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत जळगांव मनपा हद्दीतील प्रभाग क्र.०३ शिवार सागर नगर मधील गट क्रं.१२१/ब मधील महानगरपालिकेच्या खुल्या जागेस चेनलिंक फेन्सिंग करणे कामी मक्तेदार श्री.सुरजराजे विजय नारखेडे यांचे निविदा रक्कमेपेक्षा १२.९०% कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१०,९५,६७२/- मात्र खर्चाची संविदा. (मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

९. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./४० दि.१२/०५/२०२१ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्र.०८ निमखेडी शिवार गट नं.८४ ओपन स्पेस मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे कामी मक्तेदार श्री.नितीश कैलास कापडणे यांचे निविदा रक्कमेपेक्षा १०% कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१९,६७,२८४/- मात्र खर्चाची संविदा.

१०. प्रशासकीय आदेश क्र.सा.बा./४४ दि.२१/०५/२०२१ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत प्रभाग क्र.०८ निमखेडी शिवार गट नं.८० ओपन स्पेस मध्ये पेव्हर ब्लॉक बसविणे व गट नं.९० मध्ये गटार बांधणे कामी मक्तेदार श्री.राजकिरण नरेंद्र चौधरी यांचे निविदा रक्कमेपेक्षा १२.०६% कमीचे दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु.१३,१२,२७८/- मात्र खर्चाची संविदा.

११. प्रशासकीय आदेश क्र.०५ दि.०१/०५/२०२१ अन्वये संशयित कोविड-१९ रुग्णांची स्थानिक पातळीवर तात्काळ तपासणीसाठी Rapid Antigen Test Kit पुरवठा करणे कामी एकूण रक्कम रु. ७,१६,८००/- मात्र खर्चाची संविदा.

१२. प्रशासकीय आदेश क्र.२८ दि.१५/०६/२०२१ अन्वये कोविड-१९ रुग्णांची स्थानिक पातळीवर तात्काळ तपासणीसाठी Rapid Antigen Test Kit पुरवठा करणे कामी पुरवठादार Alpine Biomedicals

Pvt. Ltd., Ambala यांचे सर्वात कमीचे आलेले दर स्विकृत करुन एकूण रक्कम रु. ८,००,०००/- मात्र खर्चाची संविदा.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- काळे अमित पांडुरंग**

**अनुमोदक :- सोनवणे मुकुंदा भागवत**

**नगरसचिव :- विषय क्र. ११:-** मा.आमदार यांच्या स्थानिक विकास निधीतून जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव मधील विविध दवाखान्याना O२ Concentrator पुरवठा करणेस्तव GEM Protal झालेल्या Bid व्दारे पुरवठादार प्रभंजन ऑटोमोबाईल प्रा.लि. यांचे रक्कम रु.३५,९९,९४०/- मात्रचे दर स्विकृत करणेस मान्यता मिळणेबाबत प्रशासनाकडुन आलेल्या प्रस्तावावर विचार करुन निर्णय घेणे. (मा.आ.श्री.सुरेश दामु भोळे)

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाचा प्रस्ताव मान्य करण्यात यावा.

**नगरसचिव :-** विषय पत्रिकेवरील विषय संपलेले आहेत.आदरणिय भाऊ उपमहापौर साहेब विषय पत्रिकेवरील विषय संपलेले आहेत.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय, सभापती महोदय

**मा.सभापती :-** हो ताई

**सौ.उज्वला बेंडाळे :-** सभापती महोदय, मला एक विषय मांडायचा आहे.

**मा.सभापती :-** हो ताई बोला ना

**सौ.उज्वला बेंडाळे :-** आरोग्याधिकारी यांच्याशी चर्चा करायची आहे. स्वच्छ भारत अभियान, जळगांव शहर महानगरपालिका,स्वच्छ भारत अभियान हे आपल्या जळगांव शहरामध्ये सर्वेक्षण झाले.

**मा.सभापती :-** पाटील साहेब या

**श्री.पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** सन्मा.सभागृह ,स्वच्छ भारत अभियान

**सौ.उज्वला बेंडाळे :-** जळगांव शहर महानगरपालिका,स्वच्छ भारत अभियान हे आपल्या जळगांव शहरामध्ये कधी सुरू झालं जळगांव शहरामध्ये

**श्री.पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** स्वच्छ भारत अभियान हा जो उपक्रम मागच्या पाच ते सहा वर्षापासुन चालु आहे दरवर्षी स्वच्छ भारत अभियान सन २०२० , २०२१ असे सुरू होत असत. आता २०२१ चे स्वच्छ भारत अभियानचा उपक्रम सुरू झालेला आहे.आपण जे काही काम करतो, त्याबद्दलची तपासणी केंद्राचे पथक येवुन तपासणी करून जातं आणि त्यानुसार शहरांचे मार्कींग वगैरे सगळ होते आणि मग तो त्यानंतर रिजल्ट डिक्लियर केला जातो. आता स्वच्छ भारत अभियान २०२० चे सर्वेक्षण होवुन केंद्राची टिम येवुन तपासणी करून साधारणत: दोन ते तिन महिने झालेले आहेत. परंतू त्याचा रिजल्ट अद्याप डिक्लियर झालेला नाहीये मागच्या वर्षाचा तो रिजल्ट येत्या महिन्यामध्ये डिक्लियर होईल.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** त्याच्यामध्ये आपण काय सर्वेक्षण करतो ?

**श्री.पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** मॅडम केंद्राच्या टिमला काही मुद्दे देण्यात आलेले असतात त्यानुसार मार्कींग सिस्टिम असते की ते तपासणी करतात, त्यांची टिम तपासणी करते आणि त्याचे अहवाल ते केंद्राला सबमिट करतात आणि त्याच्यानुसार रिजल्ट डिक्लियर होतो. समिती असते ते आपल्याला ती जे तपासणी करतात त्याबद्दल आपल्याला काही माहिती नसते .

**सौ.उज्वला बेंडाळे :-**आपल्याला काही माहिती नसते की काय काम करताहेत ते कुठे सर्वे करताहेत याबद्दल ?

**श्री.पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** नाही

**सौ.उज्वला बेंडाळे :-** म्हणजे ते आपल्या महापालिकेला काही सांगत नाही का की आम्ही काय करणार आहे कोणत्या प्रभागात सर्वे करणार आहेत.

**श्री.पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** नाही

**श्री.नितीन लढ्ढा :-** ताई ती समिती गोपनियता ठेवत असते . त्याचे कारण असे आहे की ज्याला आपण सरप्राईज व्हिजीट म्हणतो . त्या पध्दतीने कोणत्या गोष्टींचे किती गुणानुक्रमांक द्यायचे आहेत आणि त्याच्यावर संपुर्ण भारतातल्या याच्यावर निष्कर्ष काढुन त्याच्यानंतर त्याला हे मिळत असतं कि आपण कितव्या स्थावर आहोत. जर कधी त्यांनी सांगीतल की आम्ही या भागाचं निरीक्षण करू तर त्या भागाची आपली

महानगरपालिका स्वच्छता किंवा त्या बाबींची कमतरता आहे ती पुर्ण करून घेवु. म्हणुन याच्या मध्ये त्या पध्दतीची गोपनियता पाळुन ती एक सरप्राईज व्हिजीट म्हणुन पाहीले जाते त्या व्हिजीट कडे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** बर ते कुठल्या कंपनीला दिलेले होते

**श्री.पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** नाही आपल्याला त्याबद्दल

**श्री.नितीन लद्ढा :-** ताई याच्यामध्ये केंद्र शासनच आहे ना स्वत:च पथक पाठवत असतं त्याच्या बद्दलची जी माहिती आहे. ती महानगरपालिकेने पथकला घेवुन पाहणी केल्यानंतरच ते भेटी देतात आणि त्यांचा जो अहवाल असतो तो कॉन्फीडेंशियल असतो.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** भाऊ मला माझ्या माहिती प्रमाणे माझ्या प्रभागामध्ये दोन महिने , दिड ते दोन महिन्यांपुर्वी दोन तिन लेडिज आणि दोन पुरूष असे सर्वे करायला आले होते. तेव्हा ते मला भेटले त्यांनी पत्र दिलं, या अश्या प्रकारचं घरोघर हे पॉम्पलेट दिलेल आहे आणि त्यांनी सर्वे असा केलेला आहे की ओला कचरा कोणता सुका कचरा कोणता तो कसा विलिगीकरण करायचा ही सगळी त्यांनी माहिती सांगीतली. घरामध्ये किती व्यक्ती आहेत. किती व्यक्तींसाठी सेप्टीटँक असायला पाहीजे, चार व्यक्तींसाठी एक सेप्टीटँक जास्त जर असतील तर दोन सेप्टीटँक अशी ही दोन प्रकारची ही सगळी माहिती सगळया नागरीकांना सांगीतली वॉर्डामध्ये माझ्याकडे त्यांनी माझ पत्र सुध्दा नेलेले आहे की आम्ही प्रभागामध्ये सर्वे केलेला आहे आणि करीत आहोत. यांच्या परमिशनने आम्ही सर्वे करायला सुरूवात केलेली आहे.अस पत्र दिल आणि त्यांचे जे कोऑर्डीनेटर आहेत , लढे साहेब म्हणुन आहेत.ते सांगतात की ज्या नागरीकांनी तक्रारी केल्यात की घंटागाडी येत नाही, आमच्याकडे सफाई कामगार येत नाहीत , आमच्याकडे झाडुवाली बाई येत नाही अशा ज्या काही तक्रारी नागरीकांनी केल्या त्या ते त्यांच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांकडे सांगतात आणि वरीष्ठ अधिकारी आपले जे महानगरपालिकेचे आरोग्याधिकारी आहेत यांना ती सगळी माहिती दिली जाते. जी मी माहिती घेतली ती मी तुम्हाला सांगतेय की आपल्या सगळया सन्मा.सदस्यांना पण ती सगळी माहिती व्हावी. यासाठी मी सगळा हा आज विषय घेतलेला आहे की असे जर का ते सर्वे करता आहेत आणि ते जर आपल्या लोकांना सांगताहेत की येथे मजुरांची कमी आहे. तर मग आपल्या महानगरपालिकेचे काम नाहीये का ? की आपण त्यांच निवारण करायला पाहीजे , त्यांना ज्या समस्या आलेल्या आहेत. त्या समस्या जाणुन त्यांच्यावर चर्चा करून काय प्रोव्हाईड करायला पाहीजे हे आपलं काम नाहीये का महानगरपालिकेच उत्तर मिळावं मला.

**श्री.पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** मॅडम आपण जे पत्रक दाखवले ना ते आयईसी अंतर्गत आपण एक मक्तेदार नेमलेले होते.त्यांनी घरोघरी जावुन ते सर्वेक्षण केलेले आहे. ईन्फॉर्मेशन , कम्युनिकेशन चे जे मक्तेदार आहेत ना लढे बिग वी टेलिकॉम त्यांच ते पत्रक आहे. त्यांनी त्या द्वारे त्या वॉर्डात जावुन असे सुचित करतात की , ओला कचरा , सुका कचरा कसा वेगळा करावा , नंतर त्यांचे बरेच मुद्दे आहेत. ओला कचरा नेमका कोणता , सुका कचरा नेमका कोणता याचे ते पत्रक दिलेले आहे. ते आपलेच जे मक्तेदार नेमलेले आहेत ते आहेत. तो भाग वेगळा आहे आणि स्वच्छ सर्वेक्षणचा भाग वेगळा आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** मग मी हेच विचारतेय तुम्हाला हे जे जळगांव शहर महानगरपालिका स्वच्छ भारत अभियान , स्वच्छ सर्वेक्षण अस त्यांनी पॉम्पलेट दिलेले होते मला

**श्री.पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** हो , त्या अंतर्गत आपण नेमलेले मक्तेदार आहेत ते आपण त्या मक्तेदारा द्वारे जनजागृती करत असतो. त्यांनी ते बनविलेले आहेत मॅडम

**सौ.उज्वला बेंडाळे :-** जनजागृती आपण करतो आहेत मग त्यांना ज्या समस्या कळाल्या आहेत नागरीकांकडुन मग त्याच्यावर तुम्ही काही ईम्प्लीमेटेशन केल का की काही त्या प्रभागांमध्ये कशाची गरज आहे. आपण त्याच्यामध्ये त्या प्रभागामध्ये काय आवश्यकता आहे

**श्री.पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** त्यांनी जे काही रिपार्ट सम्बिट केले त्यानुसार आपण उपाययोजना करत आहोत.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** आणि आणखी मला अशी माहिती मिळते आहे की हा सर्वे चालुच राहतो. याला काय अडचण नाही.याला आपण काही पैसा खर्च केला असेल ना सर्वेक्षण करतोय तर का फुकट दिलेल आहे त्यांना सर्वे करायला.

**श्री.पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** नाही , नाही त्यांना आपण तक्ता दिला होता. त्यांनी जे सर्वेक्षण करून आणलेले आहे. त्यात काय अडचणी आहेत त्या आपण वेळोवळी दुर करत असतो

**सौ.उज्वला बेंडाळे :-** पण मला समाधान नाहीये**.** माझ्या वॉर्डामध्ये ज्या काही समस्या आहेत तुमच्या पर्यंत पोचवल्या असतील त्याच एकही निराकरण झालेले नाहीये. माझ्या पुर्ण वॉर्डात फक्त सहा ते सात जण

असतात. त्याच्यामध्ये २५ ते २६ हजाराचा वॉर्ड आहे.एवढ्या मोठया वॉर्डामध्ये नऊ माणस पुरे होत नाहीत आणि त्यांनी पण वारंवार सांगीतलेले आहे की तिथे समस्यांबाबत तिथे लोक तक्रारी करत आहेत.

**मा.सभापती :-** पाटील साहेब ताईंनी ज्या सुचना केलेल्या आहेत त्या समस्या , तक्रारींचे निवारण करण्यात यावे.

**श्री.पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** हो तक्रारीचे निवारण करण्यात येईल.

**मा.सभापती :-** निवारण कराव आणि जी काही माहिती असेल ती त्यांना देण्यात यावी.

**श्री.पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** हो

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय ,

**मा.सभापती :-** बोला भाऊ,

**श्री.कुलभुषण पाटील :-** आपण स्वच्छ भारत अभियान अंतर्गत आपण २०१८ मध्ये शौचालय आणि युरीनलच्या बाबतीमध्ये आपण एक टेंडर काढलेले होते.त्यावेळेला आरोग्याधिकारी उदय पाटीलांकडे चार्ज होता. त्यावेळे पासुन ते आजपर्यंत त्या टेंडर चे काय झाले लॅप्स झाले की त्या ठेकेदाराला काळया यादीत टाकले की काय , त्याने काम केले की नाही केले किंवा कुठल्या अडचणी आल्या हे मला माहिती नाही. परंतू त्याठिकाणी ते कामाचे कार्यादेश देण्यात आलेले होते त्या ठिकाणी आजतागायत तब्बल दोन ते अडीच वर्षामध्ये आतापर्यंत त्या ठिकाणी कुठल्याही प्रकारचे युरीनल हे उभे झालेले नाहीये. काय कारण आहे त्याचे , साहेब कुणीतरी चौधरी नावाच्या मक्तेदाराने युरीनल बांधण्याचा तो मक्ता घेतलेला होता. परंतू त्या ठिकाणी अजुन पर्यंत एक विट सुध्दा रचली गेलेली नाहीये.

**श्री.अरविंद भासले, शहर अभियंता :-** मा.सभापती, सन्मा.सभागृह भाऊ माहिती घेवुन दुपारी प्रत्यक्ष माहिती सांगतो की या प्रकरणाचे काय स्टेटस आहेत.

**श्री.कुलभुषण पाटील :-** परंतू माझ्या माहिती नुसार त्याला लेखी कार्यादेश निर्गमित करण्यात आलेले होते. तो संबंधित ठेकेदार हा इतक्या गेंड्याच्या कातडीचा आहे. त्याला वाटत माझ काहीही होत नाही म्हणुन त्याने गेल्या दोन वर्षभरामध्ये त्या ठिकाणी एक विट सुध्दा रचलेली नाहीये. संबंधितांवर त्याला कारवाई करून त्याला काळ्या यादीत टाकण्यात यावं. असे मस्ती करणारे जर का कुणी मक्तेदार असतील आणि अश्याने जर का जळगांव शहराच्या विकासामध्ये अडचणी निर्माण होत असतील , वेळेत काम होत नसतील. तर मला वाटत की अश्या ठेकेदारांना वापस आपण प्रोत्साहन न देता जर का त्यांना काळ्या यादीत टाकल. तर ते याच्या नंतर अश्या कुठल्याही प्रकारची मस्ती करणार नाही.

**श्री.अरविंद भासले, शहर अभियंता :-** आजच प्रकरण पाहुन माहिती घेतो व आज ठेवतो जे काही असेल.

**श्री.कुलभुषण पाटील :-** ठिक आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय , मी पहिल्या दिवशी म्हंटले होते तुम्ही आठ दिवसांमध्ये मिटींग काढणार त्या प्रभागांना सुचना देवुन टाका, मिटींग काढायच्या पहिले प्रस्ताव लवकरात लवकर पाठवायचे असे आणि मिटींग काढायच्या पहिले

**मा.सभापती :-** नक्कीच आपण डॉकेट आल्यानंतर लवकरात लवकर मिटींगचे आयोजन करू. या नंतर आपल्याकडे मागे दोन तिन सभेमध्ये आपण मेलेल्या जनावरांविषयी चर्चा झालेली आहे आणि त्याबाबत आपण मेलेले जनावरे उचलण्यासाठी कामगार वाढवण्याची मागणी केलेली आहे आणि यासाठी दोन तिन लोकांचे मला वाटत अर्ज सुध्दा आलेले आहे. तर आपण पुढे काय कार्यवाही केली त्याची माहिती सभागृहाला देण्यात यावी. अर्ज फेब्रुवारी पासुन आलेले आहेत , लोकांनी दिलेले आहेत.संख्या कमी आहे आणि ती वाढवण्याची मागणी केली आहे आणि मान्यता पण दिलेली आहे संख्या वाढविण्यासाठी सभेने .

**श्री.पवन पाटील, आरोग्याधिकारी :-** मेलेले जनावरे उचलण्यासाठी सध्या मनपाकडे दोनच कर्मचारी होते .त्यांनाही आपण सहा सहा महिन्यांची मुदतवाढ देतो त्याअनुषंगाने आपण आपल्याकडे काही अर्ज प्राप्त झाले होते.तिन अर्ज आपल्याकडे प्राप्त झाले होते.त्यांच्या नियुक्ती संबंधिची प्रोसेस पुढे आस्थापना विभागाकडुन करण्यात येत आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** परंतू आयुक्त महोदय मला वाटतं ते जे दोन कर्मचारी होते . नाडे आणि तो दुसरा कर्मचारी त्या दोन कर्मचाऱ्यांना कायम करण्या संदर्भातील आज साधारणत: त्याच्यावर पाच सात वर्षापासुन चर्चा होतेय आणि त्या कर्मचाऱ्यांना मात्र न्याय मिळत नाही. तर त्याच्या संदर्भात नेमकी प्रशासनाची भुमिका काय आहे.

**मा.आयुक्त :-** याचा प्रस्ताव आपण राज्य शासनाकडे पाठवला होता, परंतु अशा प्रकारची मेलेली जनावरे उचलण्यासाठी पदे नाहीत . आपल्याकडे ही पदं आहेत ही सफाई कामगार किंवा कामगार हे आरोग्य

खात्यामध्ये आहेत आणि त्याच्यावरची जी नियुक्तीची प्रक्रीया आहे ती ठरलेली आहे.सफाई कामगार हे फक्त अनुकंपा आणि लाड पागे पध्दतीनेच भरले जातात . सरळ सरळ काही कुठले कामगार भरले जात नाहीयेत आणि आता आपण ज्यावेळेला नविन आकृतीबंध मागु त्यावेळेला काही नव्याने पदं झाली तर आपल्याला अर्ज मागवुन करता येतील.त्यामुळे अशा पध्दतीने कंत्राटी मध्ये भरलेली त्याला मंजुरी मिळण थोडस अवघड आहे.आत्ता सुध्दा ९६ कर्मचारी कायम करण्यासाठी ऑर्डर दिलेली आहे.त्याही मध्ये असे म्हंटले आहे अशा पध्दतीने कुठल्याही प्रकारे रोजंदारी कर्मचारी नेमू नयेत .त्यामुळे आपल्याला आस्थापनाच्या व्यतिरीक्त जादा कर्मचारी आवश्यक असतील तर आपण जसे आता कोविड साठी घेतलेले आहेत, किंवा आरोग्य खात्यासाठी आपण जे आपण वॉटरग्रेस कडुन घेतोय . असा आपल्याला लेबर सप्लायचा ठेकाच द्यावा लागणार आहे.कंत्राटी पध्दतीने किंवा रोंजदारी मानधन पध्दतीने कर्मचारी नियुक्ती ही अनियमीतता समजली जाते .त्यामुळे हे करण बरोबर नाहीये आणि अशाप्रकारे जर नेमले गेले असतील. तर त्यांना कायम करण्यामध्ये सुध्दा अडचणी येतात.

**श्री.नितीन लढ्ढा :-** पण नविन आकृतीबंधामध्ये अशा पदांची निर्मीती केली जाईल का ? मेलेल्या जनावरे उचलण्या संदर्भातील

**मा.आयुक्त :-** आपण आकृतीबंध तयार करून पाठवतोय . त्याच्यामध्ये आपण सहा कर्मचारी हे केवळ आपण त्याच्यामध्ये स्वतंत्रपणे मागणी करतोय. येणाऱ्या महासभेला आम्ही तो विषय ठेवतोय.

**श्री.नितीन लढ्ढा :-** ठिक आहे, ठिक आहे.

**मा.सभापती :-** यासोबत

**श्री.कुलभुषण पाटील :-** साहेब याच्यामध्ये आयुक्त महोदय, दोन मिनिटे सभापती महोदय याच्यामध्ये मला एक विशेष सुचना मांडायची आहे. नितीनभाऊ याच्यामध्ये एक विषय आहे की आता आपण जळगांव शहरामध्ये साफसफाईच्या बाबतीत किंवा ज्या कचरा उचलण्याच्या बाबतीत काही ठिकाणी जी अनियमीतता दिसते.त्याच्य अनुषंगाने आम्ही महापौरांच्या दालनामध्ये मा.महापौरांच्या उपस्थितीत आरोग्याधिकारी , सि.एस.आय, एस.आय यांच्या उपस्थितीत एक मिटींग घेतली होती. त्याच्यामध्ये सि.एस.आय, एस.आय लोकांचा मुख्यत: म्हणणे होतेकी आमच्या कडे जे एस.आय लोक आहेत.आपल्या सि.एस.आय पैकी काही गैरहजर असतात किंवा सि.एस.आय लोकांना अतिरीक्त एस.आय आणि सि.एस.आय असे दोन्ही चार्ज देण्यात आलेले आहेत.तर मला असं वाटत भाऊ की आपण जोपर्यंत आपला आकृतीबंध मंजुर होत नाही. तोपर्यंत आपल्याला जे एस.आय आणि सि.एस.आय टेक्निकल लोक लागतात. जे लोक एस.आय आणि सि.एस.आय आहेत.त्यांना काम करण्यात थोडी अडचण होते. तर मला अस वाटत की जो पर्यंत आपला आकृतीबंध मंजुर होत नाही.रोजंदारी बेसीस वर किंवा ऑनलाईन बेसिस वर किंवा कॉन्ट्रॅक्टर पध्दतीने एस.आय आणि सि.एस.आय ची भरती केली गेली पाहीजे जेणेकरून आपल्याला त्या टेक्निकल गोष्टींची अडचण होणार नाही आणि शहराच्या साफसफाईमध्ये भर पडेल आणि सन्मा.सदस्यांच्या ज्या वारंवार येणाऱ्या तक्रारी आहेत.कचरा उचलण्याच्या बाबतीतल्या असो किंवा गटार साफसफाई करण्याच्या बाबतीतल्या असो तरत्या

**मा.सभापती :-** कुलभुषणभाऊ

**श्री.कुलभुषण पाटील :-** एकच मिनिट भाऊ आणि आपल्याला कुठेतरी ते समाधान मिळेल शहरवासीयांना अस मला वाटत

**मा.सभापती :-** पाटील साहेब

**श्री.पवन पाटील, आरोगयाधिकारी :-** सन्मा.सभागृह , जळगांव शहराचे एकूण १९ वॉर्ड आहेत. १९ वॉर्ड पैकी सद्यस्थितीत फक्त दोन रेग्युलर सॅनिटरी इंन्स्पेक्टर आहेत. बाकीच्या ज्या १७ वॉर्डामध्ये जे सॅनिटरी इंन्स्पेक्टर नेमण्यात आलेले आहेत.ते मुळात सफाई कामगार आहेत.त्यांच थोडफार एज्युकेशन किंवा लिहीता वाचता येत असल्या कारणाने आपण त्यांना युनिट प्रमुख किंवा सॅनिटरी इंन्स्पेक्टर म्हणुन अस पद नेमुण दिलेले आहे. त्यांच्याकडुन आपण सद्यस्थितीत काम करून घेतो. परंतू एस.आय हे टेक्निकल पद नाहीये.

**श्री.कुलभुषण पाटील :-** पाटील साहेब मला एक सांगा की ते समाधान कारक काम करताहेत का आपण मागच्या मिटींगमध्ये जे झालं आपण सुध्दा त्या मिटींगमध्ये उपस्थित होते. ते समाधानकारक काम नाही होत आहे ना.त्याच मुळ कारण सांगा काय आहे ते

**श्री.पवन पाटील, आरोगयाधिकारी :-** काही युनिट प्रमुखांच्या बाबतीत थोड मुळात ते सफाई कामगार असल्यामुळे कामाच्या बाबतीमध्ये थोडया अडचणी येतात. तरी पुढे या पदाबद्दल पुढील प्रोसेस करण्यात यावी असे मी म्हणेल.

**श्री.कुलभुषण पाटील :-** आयुक्त महोदय , सभापती महोदय, मला असं वाटत की त्या जागेंसाठी जर टेक्निकल पर्सन जर असले, तर मला अस वाटत की कामामध्ये कुठेतरी सुसुत्रता येईल. तर माझी सभागृहाला आणि प्रशासनाला विनंती आहे की आपण जर अश्या पध्दतीने कामामध्ये जर सुसुत्रता आणायची असेल तर आपण रोजंदारी बेसीसवर किंवा कॉन्टॅक्ट बेसीस वर किंवा मानधन बेसीसवर आपण जर लोक नेमले तर आपल्याला मला असं वाटत की जळगांव शहराच्या साफसफाई मध्ये व्यवस्थित भर पडेल.

**मा.सभापती :-** तुमच्या सुचनेचे पालन केले जाईल. पण मानधनावर , कॉन्ट्रॅक्ट पध्दतीवर जशी जशी आपल्याला आवश्यकता भासेल त्या पध्दतीने आपण कर्मचाऱ्यांची नियुक्ती करू.

**श्री.नितीन लढ्ढा :-** सभापती महोदय,

**मा.आयुक्त :-** नितीनभाऊ , एकच मिनिटं

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय

**मा.आयुक्त :-** नितीनभाऊ ,

**श्री.नितीन लढ्ढा :-** जी

**मा.आयुक्त :-** आता सन्मा.उपमहापौरांनी जो मुद्दा मांडला की या सगळयामध्ये ज्या काही आपल्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या असतील किंवा पदोन्नत्या असतील , कालबध्द पदोन्नत्या असतील. या सगळया गोष्टी आपण ज्या मागच्या काही वर्षांपासुन करू शकलेलो नाहीत. या सगळया अडचणींचे मुळ जो आहे तो आपला आकृतीबंध अद्यापपर्यंत मंजुर नसणे हा आहे.आता आपण पुर्वी २०१९ मध्ये जो आकृतीबंध तयार करून राज्य शासनाला पाठविलेला आहे. परंतू बहुतांशी खात्यांच्या बाबतीमध्ये याच्यामध्ये खात्यांचा विव्ह जो आहे. त्या त्या खाते प्रमुखांचा किंवा त्या खात्याच्या अधिकाऱ्यांचो तो बहुतांशी घेतला गेला नाही. अशा रितीने आस्थापना विभागामार्फत तो एकत्रित पणे तयार करून पाठवला तो सगळयांशी चर्चा करून तो मंजुर करावा असा सगळयांचा त्याच्याबद्दलचा सुर होता. म्हणुन आता मी सगळया विभागांशी चर्चा करून , सगळया वरीष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून आकृतीबंध जो आता आपण नव्याने बनवतोय तो येणाऱ्या महासभेला करू.कुठलेही पद जर आपल्या भरायचे म्हंटल कुठलेही पध्दतीने असेल तर ते केवळ कुठलेही पद आपल्या आकृतीबंधामध्ये मंजुर असेल तरच आपल्याला ते भरता येते . आकृतीबंधा बाहेरच पद जर आपण भरल तर अनियमितता होते.त्याचा आपल्याला आक्षेपही येवु शकतो आणि दुसरी गोष्ट कुठल्याही कर्मचाऱ्याची कुठल्याही पध्दतीने जर २४० दिवस भरले तर त्याच्यामध्ये कामगार कायद्याखाली त्या कर्मचाऱ्याला पुन्हा कायम सेवेचे संरक्षण मिळु शकते आणि ती एक मोठी जबाबदारी महानगरपालिकेवर येवु शकते. यामुळे आपल्याला मानधन असेल , कंत्राटी पध्दतीने असेल किंवा असे हे कर्मचारी थेट नियुक्त करणं हे योग्य नाही. त्यामुळे आपल्याला आकृतीबंध मंजुर करून नियमित पध्दतीने आपल्याला कर्मचारी अशी आवश्यकता असेल त्यावेळी भरावी लागतील.

**श्री.कुलभुषण पाटील :-** आवाज कट झाला का ?

**श्री.नितीन लढ्ढा :-** हो आवाज कट झाला , नाही आवाज येत नाहीये , प्रशासनाशी संपर्क तोडण्यात आलेला आहे.

**श्री.कुलभुषण पाटील :-** प्रशासनाशी संपर्क तोडण्यात आलेला आहे. भाऊ याच्यामध्ये तोच विषय आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** बर

**श्री.कुलभुषण पाटील :-** याच्यामध्ये आपले जे सॅनिटरी इंन्स्पेक्टर आहेत ना , तर ते जर करून घेतल ना आपण तर थोडस सुसुत्रता येईल आणि आपल्याकडे बरेच आहेत.

**श्री.नितीन लढ्ढा :-** योग्य आहे, योग्य आहे , कुलभुषणभाऊ तुमची सुचना अत्यंत योग्य आहे कारण शेवटी कसं झालय. आज परिस्थिती अशी झालीय की शिपायांना आयुक्तांच्या पदावर बसवुन टाकलेले आहे आपण आणि त्याच्याकडुन चांगल्या प्रशासनाची अपेक्षा ठेवतोय

**श्री.कुलभुषण पाटील :-** हो ना भाऊ आणि काय होवुन जात म्हणजे त्याच्यामध्ये शिपाईला आपण काय सांगतोय ग्रेड १ चे काम कर .

**श्री.नितीन लढ्ढा :-** नाही नाही आयुक्त पदाची जबाबदारी तु सांभाळ .

**श्री.कुलभुषण पाटील :-** त्याच्यामुळे भाऊ काय होवुन गेलय की थोडस कंन्फ्युजन आहे त्यांच्यामध्ये ते आपण त्यांना काही विचारले तर ते काहीतरी उलट सुलट उत्तर देतात आणि मग त्याच इरीशन कामात जाणवते भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** बरोबर , खर आहे.

**सौ.उज्वला बेंडाळे :-** आपल्याला ते सजेशन करतात

**मा.आयुक्त :-** आपल्याला आकृतीबंध तातडीने मंजुर करून घेण आवश्यक आहे.म्हणुन आपल्याला त्याला प्राधान्य द्याव लागेल.

**श्री.कुलभुषण पाटील :-** आयुक्त साहेब

**श्री.नितीन लढ्ढा :-** मा.आयुक्त महोदय, मी काय म्हणतोय की आता कुलभुषण भाऊंनी मांडलेली सुचना आकृतीबंधाच्या अनुषंगाने ती मान्य केली एखादेवेळेस परंतू शहराचा खऱ्या अर्थाने जर कधी आपण वाढलेला विस्तार आणि स्वच्छतेच्या दृष्टीकोनातुन असलेल्या कामगारांची संख्या याचा ताळमेळच कुठे बसुन येत नाही. आपण प्रत्येक मिटींगला एस.आय , सि.एस.आय आणि पदाधिकाऱ्यांसोबत किंवा अधिकाऱ्यांसोबत बैठकीचे आयोजन करतो आणि त्यावेळेला असलेल्या कर्मचाऱ्यांची जी संख्या आहे ती अत्यंत तोकडी पडते आणि त्याचाच परिणाम गटार साफ करण्यावर होतो. रस्ते झाडण्यावर होतो. तर त्याच्यावर आपण चांगल्या पध्दतीने रस्ते साफ करण्यावर आपण जी अपेक्षा ठेवणार असे वाटते की कुठेतरी व्यवहारीक विषय दिसुन येत नाहीये.तर यासंदर्भात आपण पुनश्च एकदा रिव्ह्युव घ्या आणि खऱ्या अर्थाने किती कामगारांची या शहराला गरज आहे आणि त्या दृष्टीकोनातुन त्या कामगारांची जितकी गरज असेल तेवढ्या कामगारांची संख्या वाढवण्यासाठी सुध्दा तेवढेच गरजेचे आहे. अन्यथा काय होईल की आहे त्याच मनुष्यबळामध्ये म्हणजे काय आहे की तोंड झाकले की पाय उघडे पडतात आणि पाय झाकले तर तोंड उघड पडतं अशी परिस्थिती एकंदरीत दिसुन येते आहे. या बाबतीत आपण गांभीर्याने विचार करायला पाहीजे.

**मा.आयुक्त :-** निश्चित करू आपण त्याचे दोन भाग करू. जे कायम आपल्याला पदे भरावी लागतील.

**श्री.कुलभुषण पाटील :-** सभापती महोदय, आयुक्त साहेब , सन्मा. नितीनभाऊ मला असं वाटत की, आता जस आयुक्त साहेबांनी सांगीतले की आपल्याला काही पद भरती करत असतांना कामगार कायद्यानुसार आणि आकृतीबंधाच्या आपल्या त्या अधिनियमामध्ये आपल्याला ते आकृतीबंधामध्ये आपले ते एस.आय आणि सि.एस.आय ची पद तर मंजुरच आहेत आणि ते आपल्याला भरायला कॉन्ट्रक्ट बेसवर किंवा मानधन तत्वावर भरायला मला वाटते की काही अडचण येईल. आकृतीबंधामध्ये मंजुर पद संख्या असल्यामुळे

**मा.आयुक्त :-** नाही आपल्याला जो आपला आकृतीबंध आहे तो फक्त महानगरपालिका झाल्यानंतर जी आठ पदे आपल्याला मंजुर झालेली आहेत. आपल्याला महानगरपालिका म्हणुन आकृतीबंध नव्याने मंजुर करून घ्यावा लागेल. तो झाल्यानंतर आपली जी कायमस्वरूपी जी पद असणार आहेत. म्हणजे जी पद व्यपगत होणार नाहीत.अशी पद आपल्याला विहीत कार्यपध्दतीचा अवलंब करून भरता येईल आणि याच्यामध्ये मा.उपमहापौर असतील किंवा मग सन्मा.नितीनभाऊ असतील. आपल्या ज्या सुचना आहेत की आत्ताची परिस्थिती किंबहुना पुढच्या एक दहा वर्षामध्ये वाढता विस्तार मग तो भौगोलिक असेल वा लोकसंख्येचा असेल याचा विचार करून आपण तो आकृतीबंध बनवतो आहे. फक्त वर्ग ४ चे जे कर्मचारी असतील . याच्याबाबतीमध्ये आपल्याला मोकळया हाताने आपण नविन पदे मंजुर न करता आपल्याला ही गरज जी सगळया ऑऊटसोर्सींगच्या माध्यमातुन करावी लागेल. ऑदरवाईज तो खर्च आपल्याला ३५ टक्क्यांच्या मर्यादेमध्ये ठेवणे अवघड होईल. म्हणजे कर्मचारी आपल्याला कॉन्ट्रॅक्टर कडून सप्लाय करून घेता येणार नाहीत.अशा कर्मचाऱ्यांची पदे आपण निर्माण करू. जसे आपण म्हणताहेत त्याप्रमाणे सी.एस.आय असतील किंवा एस.आय असतील किंवा सुपरवाईजरी काही पोस्ट असतील . बाकीचे इंजिनियर असतील . बाकी जी वर्ग ४ ची असतील बागेकरीता आवश्यक असतील, रस्ता दुरूस्तीकरीता आवश्यक असतील किंवा स्वच्छतेसाठी आवश्यक असतील.ती मात्र आपल्याला आऊटसोर्स पध्दतीने घ्यावी लागेल आणि याच्यासाठी आपल्याला आकृतीबंधामध्ये पदांची आवश्यकता लागणार नाही. ती आपण आपल्या शहराची गरज विचारात घेवुन आपण त्याची स्वतंत्र व्यवस्था करू.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अध्यक्ष महोदय , मला बोलयचे आहे आपली १७ मजली इमारत आहे त्यासाठी मी थ्रेटींग मशीन सांगीतल्या होत्या. आता ६ महिन्या पहिले अजुन पर्यंत उपलब्ध झाल्या नाहीत आणि जळगांव शहरासाठी मोठी जेटींग मशिन सांगीतली होती. जळगांव शहरामध्ये मुतारी साफ करणे किंवा संडाशी चोकअप होतात काही काही ठिकाणी त्यासाठी त्या अजुनपर्यंत सहा महिने त्याचा पाठपुरावाच झाला नाही.भांडार विभाग म्हणतात ते आरोग्या विभागाचे आहे , ते म्हणतात त्यांचे आहे. ते म्हणता त्यांच्या नावावर ते म्हणता त्यांचे नावांवर आहे . कुठपर्यंत चालतय आहे हे सहा महिने झाले त्याला सभेमध्ये विषय करून, पुर्ण १७ मजली वास मारायला लागुन गेलेली आहे. या कार्यकाळामध्ये सहा महिन्यांपासुन पाठपुरावा सुरू करीत आहे.

**श्री.दिनानाथ भामरे , भांडारपाल :-** जळगांव शहरामध्ये जेटींग मशिनचा तपास केला असता जेटींग मशिन कुठेही आढळुन आलेली नाहीये आणि आपण ऑनलाईन मागविलेल्या आहेत . त्या आपल्याला उद्यापर्यंत मिळुन जातील.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** अहो भामरे साहेब तुम्ही मला आता एक महिन्यापहिले सांगीतले होते.

**श्री.दिनानाथ भामरे , भांडारपाल :-** हो ना मग जळगांव मध्ये

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** त्याला आता एक महिना

**श्री.दिनानाथ भामरे , भांडारपाल :-** हो , हो मी सगळी कडे तपास केला जळगांव मध्ये

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** तुम्हीच आता सांगीतले की सगळीकडे तपास केला असेल. आता येईल तेव्हा येईल दोन / चार दिवसात येईल एक महिना होवुन गेला त्या विषयाला तुम्हाला सांगुन मी दररोज मी तुमच्या ऑफीसला येवुन फॉलो करतो या विषयावर.

**श्री.दिनानाथ भामरे , भांडारपाल :-** हो दोन दिवसांत मशिन येणार आहे.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** १७ मजलीचा ड्रेनेजचा सप्लाय चोकअप होतोय १७ मजली वरून आपल्या डोक्यावर पडतील तोपर्यंत ते मागवणार नाही का तुम्ही

**श्री.दिनानाथ भामरे , भांडारपाल :-** भाऊ दोन दिवसात मशिन येवुन जातील.

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** आणि त्या मोठया जेटींग मशिनचे काय झाले

**श्री.दिनानाथ भामरे , भांडारपाल :-** ते आपल्याला जिएम पोर्टलवर खरेदी कराव्या लागतील भाऊ

**श्री.नवनाथ दारकुंडे :-** बर तसे तुम्ही वाहन विभागाला सांगा आणि तुम्ही ही प्रोसिजर कंम्पलीट करा लवकरात लवकर.

**श्री.दिनानाथ भामरे , भांडारपाल :-** हो हो भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** त्या जेटींग मशिन आहेत ना आयुक्त साहेब जेटींग मशिन ज्या आहेत ना त्या जेटींग मशिन तातडीने खरेदी करणे गरजेचे आहे.कारण बऱ्याच ठिकाणी काय होते की गटारीच्या वर क्रॉसिंगवरचे जे कल्व्हर्ट जे आहेत त्याचे स्लॅब त्याच्यामुळे फोडले जातात आणि पर्यायाने काय होते की केलेला खर्च जो आहे तो वाया जातो . तर जेटींग मशिन खरेदी केले तर हे जे क्रॉसिंगवरचे कल्व्हर्ट असतात ते साफ करणे सोईचे होईल.

**मा.सभापती :-** नक्की भाऊ लवकरात लवकर पुर्तता केली जाईल.यानंतर आपले काही कर्मचारी सेवानिवृत्त झालेले आहेत.त्यांचा क्षमापनाचा प्रस्ताव पाठविलेला आहे त्यात १९ ते २० कर्मचारी आहेत. तर त्यांचे काहीतरी मला वाटते की आपण जेव्हा त्यांना नियुक्ती दिली त्यावेळेस त्यांचे काही ऐजबार झालेले आहेत असा काहीतरी विषय आहे.

**श्री.नितीन लढ्ढा :-** अहो सगळयांना क्षमापन देण्यात यावे.

**मा.सभापती :-** तर त्यांना पेंशन लागू करणेबाबत

**श्री.नितीन लढ्ढा :-** तुमच्या कार्यकाळात सगळयांना क्षमा करून टाका, राजुभाऊ त्यांच्या जेवढ्या सेवा झाल्या असतील आणि काही चुका त्यांच्याकडुन घडल्या असतील तर त्यांना माफी देण्यात यावी. सगळयांना क्षमा करून टाका.

**मा.सभापती :-** बर नक्कीच प्रशासनाने केले पाहीजे भाऊ

**श्री.नितीन लढ्ढा :-** प्रशासनाला विनंती करा त्यांच्या माध्यमातुन

**मा.सभापती :-** बर ठिक आहे. आपण मानधनावर जे काही व्हॉल्वमन आहेत. पाणी सोडणारे व्हॉल्वमन जे ५ ते ६ लोक आहेत की त्यांना कुठलेही मानधन दिले जात नाहीये. मागच्या वेळेसही मी साहेबांजवळ विषय केला होता. तर त्यांच्या मानधनाची व्यवस्था करण्यात यावी.

**श्री.नितीन लढ्ढा :-** निश्चितपणे आयुक्त महोदय ते अनेक वर्षापासुन सेवा देताहेत.विहीत पध्दतीचा अवलंब करून कुठेतरी त्यांना मानधन देण्यात यावं.

**नगरसचिव :-** आदरणिय उपमहापौर महोदय , आदरणिय भाऊ नगरसचिव कार्यालयातील स्थायी समितीचे जे कार्यासन आहे आमचे त्याचे क्लार्क आहेत आमचे लिपीक श्री.योगेश युवराज पाटील आज ते विहीत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत.त्यांच्याकडे स्थायी समितीचे जे कामकाज होते . तर मा.सभापती महोदय यांच्या संमतीने मी विनंती करतो की, स्थायी समितीतर्फे त्यांना फुलगुच्छ देवुन निरोप द्यावा अशी मी विनंती करतो.

**श्री.नितीन लढ्ढा :-** निश्चितपणे

**श्री.कुलभुषण पाटील :-** त्यांच आयुष्य सुख संपदा व आरोग्यदायी जावो.

**नगरसचिव :-** धन्यवाद

**श्री.नितीन लढ्ढा :-** आणि ज्या ज्या वेळेला तुम्हाला गरज पडेल त्या त्या वेळेला त्यांनी तुम्हाला मदत करण्यासाठी यावं.

**नगरसचिव :-** निश्चित भाऊ येतील ते , धन्यवाद

**सभागृहाने मान्यता प्रदान केली त्या अनुषंगाने ठराव क्र.३४५ पारित करण्यात आला.**

असा ठराव करण्यात येतो की, मा.आमदार यांच्या स्थानिक विकास निधीतून जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव दवाखाने विभागांसाठी O२ Concentrator पुरवठा करणे कामी आयुक्त यांचे दि.१८/०६/२०२१ च्या मान्यतेने GEM Protal वर Bid No Gem/ २०२१/B१२९८९६९ अन्वये निविदा प्रसिध्द करण्यात आलेली असुन दि.२२/०६/२०२१ पर्यंत मुदत देण्यात आली होती. दिलेल्या मुदतीत ०४ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. निविदा समिती यांनी पात्र झालेले तीन निविदा धारक १) सुनिल आर. मंत्री, २) प्रभंजन ऑटोमोबाईल प्रा.लि., व ३) ए.एस.सेल्स कार्पोरेशन यांचा दरांचा लिफाफा उघडला असता प्रभंजन ऑटोमोबाईल प्रा.लि. हे एल-१ ठरले असुन त्यांचे दर रक्कम रु.३५,९९,९४०/- मात्र सर्वात कमी आलेले असून पुरवठादार प्रभंजन ऑटोमोबाईल प्रा.लि. यांचे दर रक्कम रु.३५,९९,९४०/- मात्र स्विकृत करणेस मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

प्रशासनाने सदर प्रकरणी नियमानुसार शासन निर्णय / आदेशा नुसार आवश्यक त्या सर्व बाबींची पुर्तता करुन कार्यवाही करावी.

**सर्वानुमते मंजुर**

**अनुकुल मते :- १४ प्रतिकुल मते :- ००**

**सुचक :- लढ्ढा नितीन बालमुकूंद**

**अनुमोदक :- सोनवणे मुकुंदा भागवत**

**मा.सभापती:-** सभा संपलेली असल्याने नगरसचिव यांनी राष्ट्रगीत सुरु करावे.

**नगरसचिव :-** सर्व सन्मा.सदस्यांना विनंती करतो की सर्वांनी राष्ट्रगीत साठी उभे राहायचे आहे.

राष्ट्रगीत झाल्यानंतर सभा संपन्न झाली.

**सही/-**

**सभापती**

**जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव**